# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७
ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५७१

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १३/०५/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मध्ये रस्त्याचे नुतनीकरण करणे (सातीवली फाटा येथे प्रवेश द्वार बांधणे) कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मध्ये रस्त्याचे नुतनीकरण करणे (सातीवली फाटा येथे प्रवेश द्वार बांधणे) कामी मा. आयुक्त सो, यांनी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये प्रवेश करताना प्रवेश द्वार उभारणे बाबत आढावा बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार मा. कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता सो, यांनी सदर प्रवेश द्वार बाबतची सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव सादर करणेस सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या वसई विरार शहर महानगरपालिकेत प्रवेश करण्याच्या वॉर्ड क्र. ७५ मधील सातीवली फाटा या ठिकाणी प्रवेशद्वार उभरल्यास राष्ट्रीय महामार्गावरुन महापालिका क्षेत्रात प्रवेशाची नागरिकांना माहिती होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. तरी सदर ठिकाणी तांत्रिक सल्लागार मार्फत सामूहिक स्थळ पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून कामाची रक्कम ७७,९४,७१३/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मध्ये सातीवली फाटा येथे प्रवेश द्वार बांधणे | रु. ७७,९४,७१३/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. ७७,९४,७१३/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

१३/०५

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर
पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र . ५७२** दिनांक :-१३ /०७/ २०२२

---

| | | |
|---|---|---|
| विषय | ♦ | वसई विरार शहरमहानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा फाटा येथे मुख्य प्रवेशद्धार बनविणे. प्रशासकीय वित्तीय मंजुरी व निविदा ची पुढील कार्यवाही करणेकामी मान्यता मिळणेबाबत . |
| कामाचे नाव | ♦ | वसई विरार शहरमहानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा फाटा येथे मुख्य प्रवेशद्धार बनविणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | ♦ | रु.- १,१८,२१,२२१/- |
| कामाची आवश्यक्ता | ♦ | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातामधुन मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग आहे त्याला नालासोपारा फाटा येथे नालासोपारा रेल्वे स्टेशन कडे जाणारा राज्य महामार्गला जोडलेला आहे हा शहराचे प्रवेशद्धार आहे त्या मुळे त्या ठिकाणी एक मुख्य प्रवेशद्धाराची कमाण असावी जेणे करुन शहरात जाताना सर्व नागरीकांना शहराबाबत माहिती होईल.<br>तांत्रिक सल्लागार सबडक्शन झोन कंन्सल्टंट यांचेकडुन वसई विरार शहरमहानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा फाटा येथे मुख्य प्रवेशद्धार बसविणे या कामाचे रु १,१८,२१,२२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर खर्चास मा.सर्वसाधारण सभा/ मा.स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यक्ता आहे.सद्यस्थितीत शासनाने महानगरपालिकेवर प्रशासकाची नेमणुक केली असुन मा.आयुक्त यांच्याकडे प्रशासक यांचे अधिकार आहेत.<br>सदर कामाचा खर्च सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभाग भांडवली खर्चामधील "<br>" या लेखाशिर्ष अंतर्गत भागवणे शक्य आहे. |
| लेखाशिर्ष व तरतुद | | १.लेखाशिर्ष-" वि.नि.अ. इतर विकास कामे"<br>२.मुळ तरतुद - ६,००,००,०००/-<br>३.या प्रस्तावाचा खर्च- १,१८,२१,२२१/-<br>४.उपलब्ध शिल्लक- २,५२,३९,४८६/- |

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 Dar manjuri.docx458

ठराव

- सबब वसई विरार शहरमहानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा फाटा येथे मुख्य प्रवेशद्वार बनविणे.या कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,१८,२१,२२१/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ६७ (३) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 Dar manjuri.docx459

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५**
**दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,**
**ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com**

---

ठराव क्र. ५५३ विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : २३/०५/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती 'एफ' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४५ मधील गावराई पाडा येथे शिवमंदीर ते मथुराबाई पाटील पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रशासकिय मान्यता** :- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५३२ दि. ०७ /०२/२०१९

प्रस्तावित कामाची मुळ रक्कम :- रु. ४१,६८,४६३/-

निविदा अंदाजपत्रकीय रक्कम :- पाईप वगळून रु. २७,९१,३८८/-

तांत्रिक मान्यता :- मा. शहर अभियंता, दि. ०१/०२/२०१९

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ४१,६८,४६३/-

जाहिर निविदा सुचना :- १) दै. आपला महानगर
२) दै. मिड-डे
३) दै. पुर्णविराम

ई निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि. १८/१२/२०१९

द्वितीय लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि. १६/१२/२०२१

प्राप्त निविदांची संख्या :- ०३

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे. सी. एस. मोहिते | १६.५०% जास्त दराने |
| २. | मे. हिमालय एम. पाटील | ६.६७% कमी दराने |
| ३. | मे. महेश सातपुते | १६.१०% कमी दराने |
| **४.** | **मे. एकवीरा कंन्स्ट्रक्शन** | **१८.००% कमी दराने** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यांचे अभ्यास करता **मे. एकवीरा कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% कमी दराची** निविदा प्राप्त निविदाधारकांमधील लघुत्तम दराने आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. एकवीरा कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% कमी दराची** निविदा तुलनात्मक रित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी **मे. एकवीरा कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% कमी दराच्या** निविदेस मा. निविदा समिती सभेने दि. १६/१२/२०२१ रोजी मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क)/(ड) नुसार संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'एफ' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४५ मधील गावराई पाडा येथे शिवमंदीर ते मथुराबाई पाटील पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणेकामी **मे. एकवीरा कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% कमी दराची** निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.००% कमी दराच्या** निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

13/07

(श्री. अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र. ५७४** | **विभाग: भांडार विभाग**
**दिनांक :२४/०७/२०२२**

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविणेकामी राष्ट्रीय ध्वज खरेदी करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** केंद्र शासनाच्या सुचनेनुसार दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधी मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकाव्दारे **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविणेकामी शासन परिपत्रक क्र.संकिर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/ सां.का.४ मादाम कामा रोड , हुतात्मा राजगुरू चौक , मंत्रालय , मुंबई-४०००३२ दिनांक ३० जून २०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. **"हर घर तिरंगा"** या उपक्रमा अंतर्गत सर्व शासकीय/निम शासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतीवर व नागरिकांनी स्वत:च्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फुर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिध्दी मोहिम राबविणेकामी स्थानिक स्वराज्य संस्था , पोलीस यंत्रणा , शाळा व महाविद्यालये , परिवहन , आरोग्य केंद्रे , स्वस्त भाव धान्य दुकाने , सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणाचा वापर करून सदर कार्यक्रम यशस्वी करावा अशा सुचना वरील शासन परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत.

सदर सुचनांच्या अनुषंगाने महानगरपालिका मार्फत शाळा , महाविदयालये , शासकीय , निमशासकीय, परिवहन, आरोग्य केंद्र, सरकारी संस्था प्रभाग समिती स्तरावर प्रत्येक नागरिकांना राष्ट्रीय ध्वज पुरविण्याचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक क्र : रिट याचिका-०११२/२८७/प्र.क्र.७८/विशा १-अ दिनांक ०१ जानेवारी २०१५ अन्वये राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वज संहितेच्या (Flag Code Of India) कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत तरतुद आहे. यास्तव उत्पादक **मे द फ्लॅग कंपनी, नायगांव (पूर्व)** यांच्याकडून खालीलप्रमाणे पॉलीस्टर कपडयाचे राष्ट्रीय ध्वजाचे खरेदी दर देण्यात आलेले आहेत. तसेच दरपत्रकदार यांनी दरपत्रकातील एकुण रक्कमेच्या ५०% आगाऊ रक्कम मिळणेबाबत दरपत्रकात नमुद केलेले आहे.

| अ.क्र | तपशिल (पॉलीस्टर) | दर प्रति नग | आवश्यक नग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २ X ३ (फुट) | ११०/- रू. | २५००० | २७५००००/- |
| | | | **एकुण** | **२७,५०,०००/-** |

त्यानुसार उत्पादक **मे. द फ्लॅग कंपनी, नायगांव (पूर्व)** यांचे कडून राष्ट्रीय ध्वज विना निविदा थेट खरेदी करणेकामी व ५०% आगाऊ रक्कम देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब, यांना असलेल्या अधिकारानुसार व विना निविदा अनुसुची 'ड ' प्रकरण ५ (२) (२) अन्वये **मे द फ्लॅग कंपनी नायगांव (पूर्व)** यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करून येणाऱ्या रक्कम रू. **२७,५०,०००/-** खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविणेबाबत राष्ट्रीय ध्वज खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब, यांना असलेल्या अधिकारानुसार व विना निविदा अनुसुची 'ड ' प्रकरण ५ (२) (२) अन्वये **मे द फ्लॅग कंपनी नायगांव (पूर्व)** यांचेकडून राष्ट्रीय ध्वज खरेदीकामी येणाऱ्या एकूण रक्कम रू. २७,५०,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.तसेच एकूण देयक रक्कमेतील ५०% आगाऊ रक्कम अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५७५

विभाग: भांडार विभाग
दिनांक :१४/०७/२०२२

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविणेकामी राष्ट्रीय ध्वज खरेदी करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** केंद्र शासनाच्या सुचनेनुसार दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधी मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकाव्दारे **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविणेकामी शासन परिपत्रक क्र.संकिर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/ सां.का.४ मादाम कामा रोड , हुतात्मा राजगुरू चौक , मंत्रालय , मुंबई-४०००३२ दिनांक ३० जून २०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. **"हर घर तिरंगा"** या उपक्रमा अंतर्गत सर्व शासकीय/निम शासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतीवर व नागरिकांनी स्वत:च्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फुर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिध्दी मोहिम राबविणेकामी स्थानिक स्वराज्य संस्था , पोलीस यंत्रणा , शाळा व महाविद्यालये , परिवहन , आरोग्य केंद्रे , स्वस्त भाव धान्य दुकाने , सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणाचा वापर करून सदर कार्यक्रम यशस्वी करावा अशा सुचना वरील शासन परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत.

सदर सुचनांच्या अनुषंगाने महानगरपालिका मार्फत शाळा , महाविदयालये , शासकीय , निमशासकीय, परिवहन, आरोग्य केंद्र, सरकारी संस्था प्रभाग समिती स्तरावर प्रत्येक नागरिकांना राष्ट्रीय ध्वज पुरविण्याचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक क्र : रिट याचिका-०११२/२८७/प्र.क्र.७८/विशा १-अ दिनांक ०१ जानेवारी २०१५ अन्वये राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वज संहितेच्या (Flag Code Of India) कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत तरतुद आहे. यास्तव **मे.समृध्दी महिला बचत गट, वसई (प.)** यांच्याकडून खालीलप्रमाणे पॉलीस्टर कपडयाचे राष्ट्रीय ध्वजाचे खरेदी दर देण्यात आलेले आहेत. तसेच दरपत्रकदार यांनी दरपत्रकातील एकुण रक्कमेच्या ५०% आगाऊ रक्कम मिळणेबाबत दरपत्रकात नमुद केलेले आहे.

| अ.क्र | तपशिल (पॉलीस्टर) | दर प्रति नग | आवश्यक नग | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २ X ३ (फुट) | ५६/- रू. | ७५००० | ४२००००० |
| | | | **एकूण** | **४२,००,०००/-** |

त्यानुसार **मे.समृध्दी महिला बचत गट, वसई (प.)** यांचे कडून राष्ट्रीय ध्वज विना निविदा थेट खरेदी करणेकामी व ५०% आगाऊ रक्कम देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब, यांना असलेल्या अधिकारानुसार व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) अन्वये **मे.समृध्दी महिला बचत गट, वसई (प.)** यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करून येणाऱ्या रक्कम रू. ४२,००,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविणेबाबत राष्ट्रीय ध्वज खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब, यांना असलेल्या अधिकारानुसार व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) अन्वये **मे.समृध्दी महिला बचत गट, वसई (प.)** यांचेकडून राष्ट्रीय ध्वज खरेदीकामी येणाऱ्या एकूण रक्कम रू. ४२,००,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.तसेच एकूण देयक रक्कमेतील ५०% आगाऊ रक्कम अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

१४/०७
(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५७६ **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक** :१९/०७/२०२२

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' मधिल विरार पूर्व वॉर्ड क्र.१ मध्ये रस्त्याचे नुतनीकरण करणे (विरार फाटा येथे प्रवेशव्दार बांधणे)कामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १,०३,२२,७४५/-

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'सी' चंदनसार क्षेत्रातील वॉर्ड क्र.१ मध्ये रस्त्याचे नुतनीकरण करणे (विरार फाटा येथे प्रवेशव्दार बांधणे) बाबत आढावा बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार मा.कार्यकारी तथा प्र.शहर अभियंता सो, यांनी सदर प्रवेश व्दार बाबतची सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव सादर करणेस सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार प्रभाग समिती 'सी' कार्यक्षेत्रात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या वसई विरार शहर महानगरपालिकेत प्रवेश करणाच्या वॉर्ड क्र.१ मधील विरार फाटा या ठिकाणी प्रवेशव्दार उभारल्यास राष्ट्रीय महामार्गावरुन महापालिका क्षेत्रात प्रवेशाची नागरीकांना माहिती होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. तरी सदर ठिकाणी तांत्रिक सल्लागार मार्फत सामूहिक स्थळ पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून कामाची रक्कम रु.१,०३,२२,७४५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार सदर कामाचे मे.सबडक्शन झोन कंन्सल्टंन्स हयांचेमार्फत रक्कम रु.१,०३,२२,७४५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- खोदकाम, खडी, पी.सी.सी, फुटींग, कॉलम, बिम, विट बांधकाम, प्लास्टर,डांबरीकरण इत्यादी.

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम प्रथम प्रस्तावित आहे.

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :- --

संकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- वि.नि.अ. इतर विकास कामे
ब) मुळ तरतूद :- ६,००,००,०००/-
क) शिल्लक :- ३,६०,६०,६००/-
ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. १ पृष्ठ क्र. ६८
अ.क्र. ०४.

तरी सरदचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ (क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु.१,०३,२२,७४५/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेवून पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणेत येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५७७

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १४/०७/२०२२

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील दंतचिकित्सा विभागाकरिता आवश्यक असलेली उपकरणे खरेदी करणेकामी दरपत्रक मागविणेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत.

**अंदाजित रक्कम :- रु.१०.०० लक्ष**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि. ०३ जुलै, २००९ रोजी झाली असून त्यामध्ये नगरपरिषदा व ५५ महसूली गावांचा समावेश असून येथील कार्यक्षेत्रात ६ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी तसेच आजुबाजुच्या ग्रामीण परिसरातून रुग्ण दैनंदिन तपासणीकरिता येतात. सदर तपासणी करिता औषधे व साहित्यांची आवश्यकता असते. आवश्यकतेनुसार संबंधित सर्व केंद्रांना औषधे, सर्जिकल साहित्य व उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येतात. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या रुग्णालयातील दंतचिकित्सक विभागामध्ये दंतचिकित्सेकरिता उपकरणांची आवश्यकता असते. परंतु सदरची उपकरणे ई-निविदा यादीमध्ये समाविष्ट नसल्याने सदर उपकरणे उपलब्ध करुन घेणे गैरसोयीचे होत आहे. सद्यस्थितीत सर्जिकल साहित्य खरेदी करणेची निकडीची बाब लक्षात घेता महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.०७ मे,२०२१ च्या शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील ३.२.३ नुसार यांच्याकडून प्राप्त शासन निर्णयानुसार दरपत्रक मागवून खरेदी करणे योग्य होईल. याकामी रु.१०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

उपकरणांचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.क्र | उपकरणाचे नाव | मागणी |
|---|---|---|
| १ | BOYLER FOR AUTOLAVE | १ |
| २ | DENTAL CHAIR WITH COMPRESSOR AND INBUILT SUCTION UNIT | १ |
| ३ | DENTAL STOOL | १ |

| | | |
|---|---|---|
| ४ | X- RAY WALL UNIT | १ |
| ५ | ENDO MOTOR - ROTARY | २ |
| ६ | APEX LOCATOR | २ |
| ७ | HAND PIECE - AIR ROTOR | ५ |
| ८ | MICRO MOTOR | २ |
| ९ | X-RAY FILM | ३५ |
| १० | X- RAY DEVELOPER BOX | १ |
| ११ | EXTRACTION KIT | १ |
| १२ | GLASS BEAD STERILISER | १ |
| १३ | ULTRA SONIC SCALER | १ |
| १४ | ENDO BOX | २ |
| १५ | MICRO MOTOR HAND PIECE - STRAIGHT | ५ |
| १६ | MICRO MOTOR HAND PIECE CURVE | ५ |
| १७ | SPREADER | १० |
| १८ | PLUGGER | १० |
| १९ | GAS TORCH OR LIGHTER | ५ |
| २० | GAS FILLER | ५ |
| २१ | ROTARY FILES 2% S1 | १० |
| २२ | ROTARY FILES 4% S1 | १० |
| २३ | ROTARY FILES 6% S1 | १० |
| २४ | ROTARY FILES 2% S2 | १० |
| २५ | ROTARY FILES 4% S2 | १० |
| २६ | ROTARY FILES 6% S2 | १० |
| २७ | ROTARY FILES 2% F1 | १० |
| २८ | ROTARY FILES 4% F1 | १० |
| २९ | ROTARY FILES 6% F1 | १० |
| ३० | ROTARY FILES 2% F2 | १० |
| ३१ | ROTARY FILES 4% F2 | १० |
| ३२ | ROTARY FILES 6% F2 | १० |
| ३३ | COMPOSITE FLOWABLE SHADE A1 | १० |
| ३४ | COMPOSITE FLOWABLE SHADE A2 | १० |
| ३५ | COMPOSITE FLOWABLE SHADE A3 | १० |
| ३६ | COMPOSITE FLOWABLE SHADE A4 | १० |
| ३७ | COMPOSITE FLOWABLE SHADE B1 | १० |
| ३८ | COMPOSITE FLOWABLE SHADE B2 | १० |
| ३९ | COMPOSITE FLOWABLE SHADE B3 | १० |
| ४० | COMPOSITE FLOWABLE SHADE B5 | १० |

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह रुग्णालयीन उपकरणे खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली रु.१२,००,००,०००/- इतकी तरतुद केलेली असून या तरतूदीमधून आवश्यक उपकरणे खरेदी करणेकामी येणारा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. यास लेखा विभाग व लेखा परिक्षण विभाग यांनी मान्यता देऊन शिफारस केली आहे. तरी यानुसार

महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता वरील नमुद केलेली उपकरणे खरेदी करणेकामी दरपत्रक मागविणेस प्रशासकीय व वित्तिय मान्यतेची आवश्यकता आहे.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील दंतचिकित्सा विभागाकरिता आवश्यक असलेली उपकरणे खरेदी करणेकामी रक्कम रु.१० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.०७ मे,२०२१ च्या शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील ३.२.३ नुसार दरपत्रक प्रक्रिया करणेंस मंजुरी देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र:- ५७८ विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक २४/०७/२०२२

विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.96, दिवाणमान स्मशानभुमी मध्ये दुरुस्ती व रंगकाम करणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.96, दिवाणमा स्मशानभुमी मध्ये दुरुस्ती व रंगकाम करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु . 25,35,669/- (पृष्ठ क्र. 1 ते 27)

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. 96, दिवाणमान स्मशानभुमी मध्ये परिसरातील नागरीक दहन विधीसाठी करण्यासाठी येत असतात. परंतु सदर स्मशानभुमीमधील प्लास्टर व फ्लोरिंग व रंगकाम खराब झाले आहे. इतर दुरुस्ती करणे गरजेचे आहे. तरी याबाबतच्या सुचना लोकप्रतिनींधीकडुन आल्या असुन दिवाणमान स्मशानभुमीमध्ये दुरुस्ती व रंगकात करणे आवश्यक आहे.

कामाचे स्वरुप :- आर.सी.सी, स्मशानभुमी शेड दुरुस्ती, कोटा फ्लोरींग, प्लास्टर, पेटींग

अंतर्गत कामे :- प्लास्टर, फ्लोरिंग, रंगकाम, माती भराव, पत्रे व गेट दुरुस्ती.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" वॉर्ड क्र.96 , दिवाणमान स्मशानभुमी मध्ये दुरुस्ती व रंगकाम करणेकामी चालु दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 25,35,669/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

14/7

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र:- ५७८ विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक १४/०७/२०२२

विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.101, हनुमान नगर मधील सिद्धी इमारती जवळ असलेल्या नाल्यालगत संरक्षण भिंत बांधणे व स्लॅब टाकणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.101, हनुमान नगर मधील सिद्धी इमारती जवळ असलेल्या नाल्यालगत संरक्षण भिंत बांधणे व स्लॅब टाकणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु . 72,10,791/-

प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.101, हनुमान नगर येथे दोन इमारती मध्ये कच्चा नाला अस्थित्वात आहे. सदर नाला अरुंद असल्यामुळे पाणी वाहुन जाणेसाठी अडथळा येत आहे. मा.नगरसेवक व नागरीक यांचे सुचनेनुसार प्रत्यक्ष जागेवर पहाणी करुन अंदाजपत्रक रक्कम 72,10,791/- इतके तयार करणेत आलेले आहे..

कामाचे स्वरुप :- आर.सी.सी भिंत व स्लॅब
लांबी - 65.00 मी
उंची - 7.00 मी

अंतर्गत कामे :- Soling, PCC, Raft, Wall, Brick masonry, Plaster etc.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र. 101, हनुमान नगर मधील सिद्धी इमारती जवळ असलेल्या नाल्यालगत संरक्षण भिंत बांधणे व स्लॅब टाकणेकामी दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 72,10,791/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67(3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

15/07

( अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305

दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र:- ५८०

विभाग:- बांधकाम विभाग

दिनांक २४/०७/२०२२

विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.95, खलाटी पाडा ग्राउंडसाठी कंपाउंड वॉल बांधणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.95, खलाटी पाडा ग्राउंडसाठी कंपाउंड वॉल बांधणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु . 43,50,735/-

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. 95, खलाटीपाडा येथील महापालिकेचे ग्राउंड असुन सदर ग्राउंडला कंपाउंड नाही. त्यामुळे जनावरे ग्राउंडमध्ये येत असतात. तसेच मद्यपान करणेकरिता ग्राउंडमध्ये येऊन बसतात. अशा प्रकारचा गैरवापर थांबवणे व सुरक्षिततच्या दृष्टीने खलाटीपाडा ग्राउंडला कंपाउंड बांधुन संरक्षित करणे आवश्यक आहे. सदर जागेची पहाणी मा.शहर अभियंता हयांनी केलेली आहे. त्याचे सुचनेनुसार प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

कामाचे स्वरुप :- आर.सी.सी भिंत

लांबी 145 मी. उंची 1.00 मी रुंदी 0.30 मी.

रस्ता 55.00 मी रुंदी 6.00 मी

अंतर्गत कामे :- आर.सी.सी आवार भिंत, एम.एस ग्रील-1.00 मी, क्रॉक्रीट रस्ता.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.95, खलाटी पाडा ग्राउंडसाठी कंपाउंड वॉल बांधणेकामी चालु दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 43,50,735/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67 (3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

15/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305.
दुरध्वनी 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स 0250-2525107.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ५४।

विभाग :- आपत्ती व्यवस्थापन
दिनांक :- 14/07/2022

**प्रस्तावाचा विषय** :- दिनांक 13/07/2022 रोजी वाघराळपाडा, राजावली, नायगाव (पूर्व) येथे भुस्खलन/दरड कोसळून झालेल्या अपघातातील जखमी व मयत व्यक्तींना आर्थिक मदत मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :-सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आज दिनांक 13/07/2022 रोजी सकाळी 6.55 वाजता वाघराळपाडा, रामेश्वर आश्रमाच्या जवळ, राजावली, नायगाव (पूर्व) येथे बैठया चाळीतील एका खोलीवर दरड कोसळली. सदर चाळीतील एका खोली मध्ये 4 जणांचे कुटुंब राहत होते. त्या कुटुंबातील सदस्य खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्रं. | सदस्याचे नाव | वय (वर्ष) |
|---|---|---|
| 1 | श्री अमित सिंग | 40 |
| 2 | श्रीमती वंदना सिंग | 34 |
| 3 | चि. रोशनी सिंग | 15 |
| 4 | चि. ओम सिंग | 09 |

सदर ठिकाणी महानगरपालिकेचे अग्निशमन दल, एनडीआरएफ चे 23 जवान, पोलीस अधिकारी व कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थ यांचे मदतीने उपरोक्त 4 सदस्यांपैकी 1) श्रीमती वंदना सिंग वय - 34 वर्ष, 2) चि. ओम सिंग वय – 09 वर्ष यांना माती दगडाच्या ढिगा-यातून सुखरुप बाहेर काढण्यात आले. त्यांचे शरिरावर जखमा असल्याने त्या दोघांना आयएसिस या वसई येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांचेवर उपचार सुरु आहेत. मात्र 1) श्री अमित सिंग वय – 40 वर्ष, 2) चि. रोशनी सिंग वय – 15 वर्ष या दुर्घटनेत मयत झालेले आहेत. या कुटुंबियांचे नातेवाईकांशी वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाने संपर्क केलेला आहे. याबाबतचा अहवाल मा. मुख्यमंत्री कार्यालय यांना पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार मा. मुख्यमंत्री कार्यालयातून दुरध्वनी व्दारे महापालिका प्रशासनास कळविण्यात आले आहे की, सदर दुर्घटनेत महानगरपालिकेने इस्पितळात एक दिवसापेक्षा जास्त दिवस दाखल केलेल्या जखमी व्यक्तींना रक्कम रु. 50,000/- (रु. पन्नास हजार मात्र) तसेच मयत व्यक्तींना रक्कम रु. 2,00,000/- (रु. दोन लाख मात्र) मदतनिधी देण्यात यावा.

तरी सदर कुटुंबामधील जखमी व मयत व्यक्तींना महानगरपालिका प्रशासनामार्फत आर्थिक मदत मिळाल्यास सदर कुटुंबास उदरनिर्वाह करण्यास मदत होईल.

सदर खर्चासाठी सन 2021-22 सह सन 2022-23 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान नं. 35 वरील 4 नंबरचे लेखाशिर्ष **नैसर्गिक आपत्ती इतर** यामध्ये रक्कम रु. 5 कोटी इतकी तरतूद असून त्यामधून मा. आयुक्त सो. यांना महानगरपालिका अधिनियम 67 (3) क नुसार उपरोक्त जखमी व मयत व्यक्तींना आर्थिक मदत करता येईल.

सदर कुटुंबातील व्यक्तीं व त्यांचे नातेवाईक यांचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रं, बँक खाते क्रंमांक, आधार क्रमांक, सोबत जोडण्यात आले आहेत.

तरी सदर दुर्घटनेमध्ये जखमी (2) व मयत (2) झालेल्या व्यक्तींना किंवा त्यांचे वारस नातेवाईकांना महानगरपालिका प्रशासना मार्फत आर्थिक मदत मिळणे कामी तूर्त रु. 5 लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये दिनांक 13/07/2022 रोजी वाघराळपाडा, राजावली, नायगाव (पूर्व) येथे भुस्खलन/दरड कोसळून झालेल्या अपघातातील जखमी (2) व मयत (2) व्यक्तींना किंवा त्यांचे वारस नातेवाईकांना महानगरपालिका प्रशासनामार्फत आर्थिक मदत मिळणे कामी येणा-या रक्कम रु. 5 लक्ष खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

15/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

२३१५

# वसई — विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी — ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ , फॅक्स् — ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५८२

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** १४ / ०७ / २०२२

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (एफ) कार्यालयालयाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**कामाचे नाव** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (एफ) कार्यालयालयाची दुरुस्ती करणे.

**अंदाजीत रक्कम** :- रू. ९,९८,१३८/-/-

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई — विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एफ) पेल्हार कार्यालयाचे पत्रे व भिंतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे यावर पावसाळा लक्षात घेता लवकरात लवकर योग्य ती उपायायोजना करणे गरजेचे आहे.

महाराष्ट् शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २०२१-२२ च्या राज्य् दर सुचिवर आधारीत रू. ९,९८,१३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर खर्चास मा. सर्वसाधारण सभा / मा. स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत शासनाने महानगरपालिकेवर प्रशासकाची नेमणूक केली असून आयुक्त ह्यांच्याकडे प्रशासक यांचे अधिकार आहेत.

सदर कामाचा खर्च सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील बांधकाम विभाग, भांडवली खर्चामधील "" **इतर विकास कामे** '' या लेखाशिर्षा अंतर्गत भागविणे शक्य् आहे. सदर काम तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.सी.ए.टी-०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा.२ दि.२९/०७/२०२१ नुसार रू. १० लक्ष पर्यंतची कामे, मंजुर सहकारी संस्था किंवा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत करण्यास मुभा देण्यात आलेली आहे.

ठराव

-१.उपरोक्त् विषयानुसार वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (एफ) मधील पाणीपुरवठा विभाग व प्रभाग (एफ) कार्यालयालयाची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने कार्यकारी अभियंता तथा शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

२. कार्यकारी अभियंता तथा शहर अभियंता यांनी सादर केल्यानुसार वसई-वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (एफ) मधील पाणीपुरवठा विभाग व प्रभाग (एफ) कार्यालयालयाची दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या रू. ९९२२१८/- इतका खर्च अपेक्षित असून मला प्राप्त् असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर काम अत्यंत तातडीने करून घ्यावयाचे असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन शुद्धिपत्रक क्र.सी.ए.टी-०१/२०१५/प्र.क्र.२०/इमा.२ दि.२९/०७/२०२१ नुसार सदर काम मजूर सहकारी संस्था किंवा बेरोजगार अभियंता यांच्यामार्फत करून घेण्याची कार्यवाही करावी.

३०/०६

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

मुख्यप्रशासकीय ठराव क्र. ५८३

विभाग : बांधकाम
दिनांक : १४/०७/२०२२

**मुख्यप्रस्तावाचा विषय:-** मौजे आचोळे आरक्षण क्र. ४३६ गार्डन विकसीत करणे.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-**

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ६५,०७,९६६/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचा ठराव क्र. ५०२ दि. १८/०२/२०२१

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/शअ/१०७३/२१-२२ दि. २४/०१/२०२२
शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. २५/०१/२०२२

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. सामना, दै. प्रहार,
दै. वृत्तमानस, दै. प्रात:काल दै. जागरुक टाईम्स
दै. मिड डे, दै. फ्रि प्रेस जर्नल

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख :- दि. २५ /०१ /२०२२ पासुन
(प्रिपरेशन व स्विकारण्याची) ते ०२/०२/२०२२ दु. ३.०० पर्यंत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ४

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. ०३/०२/२०२२ दु. ३.०० वा.
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता

विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र. १ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध कागदपत्रे खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अभय बी. जाधव | (-) १०.४०% कमी दराने | पावती क्र. ३९८४०<br>दि. २५/०५/२०२२<br>रक्कम रु. ९१,११२/- | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | मे.ओमकार एंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने (०.००% ) | -- | -- |
| ३ | मे. आर.एस. कंन्स्ट्रक्शन | (-) १०.००% कमी दराने | -- | -- |
| ४ | मे. संजय कंन्स्ट्रक्शन | (+) ०.९९% जास्त दराने | -- | -- |

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. अभय बी. जाधव ह्यांची (-) १०.४०%** कमी दर हा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी मे. **अभय बी. जाधव ह्यांची (-) १०.४०%** कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिकेचे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्याकडे संविदा करणेकरिता मंजूरीस्तव शिफारस आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :-** सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी **मे. अभय बी. जाधव ह्यांची (-) १०.४०%** कमी दर हा सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

१५/०७

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र584 विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : 14/07/2022

प्रस्तावाचा विषय:- **वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्र प्रभागनिहाय जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ७(५) नुसार उपनिबंधक जन्म व मृत्यु नोंदणी नेमणूकी बाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जन्म मृत्यु नोंदणीचे उपनिबंधक म्हणून कामकाज महानगरपालिकेच्या 'ए' ते 'आय' अशा नऊ प्रभाग समितीमार्फत संबंधित प्रभाग समितीचे नियुक्त केलेले सहाय्यक आयुक्त/प्र.सहाय्यक आयुक्त यांचेकडून केले जाते. वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील जन्म-मृत्यु नोंदणी प्रक्रिया अधिक सहज व लोकाभिमुख करणेकामी टाटा ट्रस्ट व आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे समन्वयाने चर्चा करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानुसार मा.जयंतकुमार बांठीया माजी मुख्य सचिव महाराष्ट्र शासन तथा (CRS) मुख्य प्रकल्प मार्गदर्शक टाटा ट्रस्ट,मुंबई. डॉ.अर्चना पाटील,संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, मा.आयुक्त अनिलकुमार पवार, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे उपस्थितीत दि.२७/०१/२०२२ रोजी आढावा सभा आयोजित करण्यात आलेली होती. दि.२७/०१/२०२२ रोजी झालेल्या चर्चेनुसार व सूचनेनुसार

१. सर्व प्रभाग समिती स्तरावर खाजगी रुग्णालयात होणाऱ्या जन्म मृत्युच्या नोंदीबाबतचे संपूर्ण कामकाज प्रभाग समिती स्तरावर सहाय्यक आयुक्त/प्र.सहाय्यक आयुक्त यांनी उपनिबंधक म्हणून काम करणेबाबत आदेश देणे योग्य होईल.

२. महानगरपालिकेच्या रुग्णालयांत/माताबाल संगोपन केंद्र यामध्ये होणाऱ्या जन्म-मृत्युच्या नोंदीचे कामकाज संबंधित रुग्णालयांमध्ये करून नागरी नोंदणी (CRS) प्रणालीद्वारे संबंधित माता/पिता/पालक/नातेवाईक यांना जन्म व मृत्यु प्रमाणपत्र यथाशिघ्र वितरीत करणेकामी किंवा सदर बाबतीत गतीमानता आणण्याकरीता महानगरपालिकेच्या रुग्णालयाचे ठेका पध्दतीवर कार्यरत प्र.वैद्यकीय अधिक्षक व माता बाल संगोपन केंद्राचे प्र.वैद्यकीय अधिकारी यांना जन्म मृत्यु यांच्या नोंदणी कामाचे उपनिबंधक म्हणून कामकाज पाहणेबाबत आदेश देणे योग्य होईल.

३. तसेच या संपूर्ण कामकाजासाठी नोडल ऑफीसर म्हणून किमान अधिक्षक वा त्यावरील अधिकारी वैद्यकीय आरोग्य विभागाने प्रस्तावित करावा असे मान्य करण्यात आले आहे.

संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु महाराष्ट्र राज्य पुणे, यांना पाठविलेले पत्र जा.क्र.वविशम/वैआवि/२७९९/२०२२ दि.१०/०२/२०२२ अन्वये ठेका पध्दतीने नियुक्त वैद्यकीय अधिकारी यांना उपनिबंधक म्हणून नेमणूक देणे उचित

होणार नाही. म्हणून याबाबत संचालक (आरोग्य सेवा) यांचेकडे मार्गदर्शन मागितलेले होते. उपरोक्त विषयाबाबत नमुद केलेप्रमाणे जन्म-मृत्यु नोंदणी कामकाजासाठी उपनिबंधक नेमणूकीचा प्रस्ताव प्राप्त झाल्याचे म्हटले असून सदर प्रस्तावासोबत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत उपनिबंधक नेमणूकीबाबतच्या मान्यतेचा ठराव जोडलेला नसल्यामुळे उपनिबंधक नेमणूकीचा प्रस्ताव मा.मुख्यनिबंधक, जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यात आलेला नाही असे म्हटले आहे. तरी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ७(५) नुसार मुख्य निबंधकाच्या पुर्व मान्यतेने निबंधकास दूय्यम निबंधक नियुक्ती करुन त्यांच्याकडे आपल्या अधिकारितेतील विनिर्दिष्ठ क्षेत्रांच्या संबंधीतील आपले कोणतेही किंवा सर्व अधिकार आणि कर्तव्ये सोपवता येतील असे नमुद आहे त्यानुसार व मा.जयंतकुमार बांठीया माजी मुख्य सचिव तथा मुख्य प्रकल्प मार्गदर्शक टाटा ट्रस्ट मुंबई यांचेसमवेत दि.२७/०१/२०२२ च्या बैठकीतील सूचनेनुसार ठेका पद्धतीद्वारे नियुक्त रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक व माताबाल संगोपन केंद्राचे प्र.वैद्यकीय अधिकारी यांना जन्म-मृत्यु यांच्या नोंदणी कामाचे उपनिबंधक म्हणून कामकाज पाहणेबाबत आदेश देणेकामी प्रशासकीय मान्यता देणेस्तव प्रस्ताव सादर.

ठराव :- १. वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जन्म मृत्यु नोंदणीचे उपनिबंधक म्हणून कामकाज महानगरपालिकेच्या 'ए' ते 'आय' अशा नऊ प्रभाग समितीमार्फत संबंधित प्रभाग समितीचे नियुक्त केलेले सहाय्यक आयुक्त/प्र.सहाय्यक आयुक्त यांना उपनिबंधक म्हणून कामकाज पाहणेबाबत

२. तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ठेका पद्धतीद्वारे नियुक्त रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक व माताबाल संगोपन केंद्राचे प्र.वैद्यकीय अधिकारी यांना जन्म-मृत्यु यांच्या नोंदणी कामाचे उपनिबंधक म्हणून संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेचे अधिन राहून कामकाज पाहणेबाबत आदेश देणेकामी प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं 401 305

दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107

ई-मेल -vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. ५८५      विभाग : आस्थापना (मु.)

दिनांक : १४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी (विवीक्षीत कामासाठी ) करार पध्दतीने मुख्य विधी अधिकारी श्रेणी-१ यांची नेमणूक करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आकृतीबंध दि. ९ सप्टेंबर, २०१४ मध्ये मंजूर झाला आहे. त्यानुसार विधी विभागासाठी मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य विधी अधिकारी | ०१ | ० | ०१ |
| २ | विधी अधिकारी | ०१ | ० | ०१ |
| ३ | सहा.विधी अधिकारी | ०१ | ० | ०१ |

महानगरपालिकेत विधी अधिकारी -१, सहा.विधी अधिकारी -१, कामगार अधिकारी - १, व उप कामगार अधिकारी -२ या ०५ पदांना विधी शाखेची अर्हता आवश्यक असल्याने सदरची ०५ पदे ठेका पध्दतीने उपलब्ध करून घेतलेली आहेत.

महानगरपालिकेने मा. दिवाणी न्यायालय येथे ३ पॅनल वकील व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे १ सिनियर कॉऊसिलर व ५ पॅनल वकील यांची नेमणुक केलेली आहे.

महानगरपालिका स्थापन झालेपासुन आजतागायत मा.दिवाणी न्यायालयात सर्वसाधारणत: १५०० दावे व मा.उच्च न्यायालयात सर्वसाधारणत: १९० याचीका प्रकरणे प्रलंबित आहेत व त्या मोठया प्रमाणात प्रलंबित असलेली न्यायप्रविष्ठ प्रकरणे व महापालिकेच्या विविध विभागाच्या कामासाठी करण्यात येणारे करारनामे यामध्ये सुधारणा सुचविणेसाठी मुख्य विधी अधिकारी हे पद नसल्याने विविध कामामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. काही वेळा न्यायालयीन स्तरावर केलेले करारनामे हे कुचकामी ठरतात व न्यायालयीन निर्णय महापालिकेच्या विरोधात जातात.

दि. ०६/०६/२०२२ रोजीच्या आढावा बैठकीत मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी विधी विभागाची उक्त परिस्थिती पाहता सदर विभागासाठी मुख्य विधी अधिकारी यांची नेमणुक करावी असे निर्देश दिलेले आहेत.

महानगरपालिकेच्या स्वत:चे अधिकारी नसल्याने महानगरपालिकेच्या कामांचा खोळंबा होवु नये म्हणून शासनाचे दि. १७ डिसेंबर, २०१६ चे शासन निर्णयानुसार शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार महानगरपालिकेस शासकीय / निमशासकीय सेवेतून सेवा निवृत्त झालेल्या मुख्य विधी अधिकारी श्रेणी-१, यांच्या सेवा करार पध्दतीने घेता येतील, तथापी उक्त शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून नेमणूक करावयाच्या आहेत. तसेच आकृतीबंधात मंजूर पदांचे against सदर पदे विवीक्षीत कामासाठी विहीत कालावधीसाठी भरता येतील, अशी तरतूद आहे.

दि. १७ डिसेंबर, २०१६ चे शासन निर्णयातील परि.६ मध्ये दि.२१/०२/२०१८ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये खालीलप्रमाणे दुरूस्ती केलेली आहे.

"हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालय आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील.

तथापि;

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यासारखी प्राधिकरणे व तत्सम स्वायत्त संस्था तसेच शासनाकडून वेतनासाठी अनुदान प्राप्त न होणारे स्वायत्त शासकीय उपक्रम, नागरी संस्था, मंडळे, महामंडळे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत विशेष उद्दिष्ट वाहन (Special Purpose Vehicle) यांना या शासन निर्णयाच्या तरतूदी लागू राहणार नाहीत. उक्त नमूद प्राधिकरणे/संस्थांबाबत सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीने नियुक्त्या करावयाच्या असतीत तर, त्यांच्या असलेल्या वेतन व भत्यांबाबत तसेच त्यांच्या प्रशासकीय व वित्तीय अधिकारांबाबत संबंधित प्राधिकरणे/संस्था योग्य तो निर्णय घेतील.

सदर दुरूस्ती लक्षात घेता करार पध्दतीने नियुक्ती करावयाचे अधिकाऱ्यांचे देय असलेल्या वेतन भत्यांबाबत तसेच त्यांच्या प्रशासकीय व वित्तीय अधिकारांबाबत महानगरपालिकेने योग्य तो निर्णय घेणेचा आहे.

तरी शासकीय/निमशासकीय सेवा निवृत्त मुख्य विधी अधिकारी श्रेणी-१ यांच्या सेवा विवक्षीत कामासाठी करारपध्दतीने घेण्यासाठी वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर जाहीर सूचनेस प्राप्त झालेल्या अर्जातील ज्या शासकीय/निमशासकीय अधिकाऱ्यांना करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी नियुक्ती देणे, त्यांना द्यावयाचे विवक्षीत काम, वेतन व भत्ते तसेच त्यांना द्यावयाचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार इ. बाबत खालीलप्रमाणे प्रस्तावित करणेत येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | करावयाची विवक्षीत कामे | द्यावयाचे वित्तीय व प्रशासकीय अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मुख्य विधी अधिकारी श्रेणी-१ | १. महानगरपालिकेच्या विविध विभागांचे करारनाम्याच्या मसुद्याची तपासणी करुन त्यांची वैधानिकता (Legality) तपासणे<br>२. पॅनल वकील व संबंधित विभाग यामध्ये समन्वय साधुन मा. न्यायालयाने दिलेल्या मुद्तीमध्ये महापालिकेची बाजु मांडण्याकरिता प्रतिज्ञापत्र तयार करणे.<br>३. महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या विविध बाबींमध्ये विधी विषयक अभिप्राय देणे.<br>४. महानगरपालिकेच्या विधी सल्लागार यांच्यावर नियंत्रण ठेवणे.<br>५. महानगरपालिकेच्या सर्व न्यायालयीन कामकाजांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.<br>६. महानगरपालिकेने न्यायालयीन कामकाजासाठी पॅनल वकील नेमले आहेत. त्यांच्याशी संपर्कात राहुन त्यांचेकडुन न्यायालयीन दाव्यासंदर्भात वेळोवेळी माहिती घेऊन नियोमोचित कार्यवाही करणे. | १.अधिनस्त देण्यात आलेल्या कर्मचांऱ्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.<br>२. मा. आयुक्त लेखी आदेशाद्वारे सोपोवितील ते अधिकार, कर्तव्य व जबाबदाऱ्यां |

उक्त प्रस्तावास मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी मंजुरी दिल्यास दि. १७ डिसेंबर, २०१६ चे शासन निर्णयानुसार शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर सूचना प्रसिध्द करून सदरचे पद भरण्यात येईल.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी सामान्य प्रशासन सेवा व करार पद्धतीने घेण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी या शिर्षा अतंर्गत रु. १ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

**ठराव निर्णय :-** शासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका अ,ब व क वर्ग) मधुन मुख्य विधी अधिकारी श्रेणी-१ या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांस दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार विवक्षित कामासाठी करार पद्धतीने कंत्राटी तत्वावर घेण्याकरिता वृत्तपत्रात जाहिरात मागुन सदर पद विवक्षित कामाकरिता नियुक्ती करणेंस व शासकीय दराने त्यांचे पारिश्रमिक व इतर देय भत्ते अदा करणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

९/१/०७

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

E:\ravi patil\advocate .docx

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५**
**दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७**
ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५८६

**विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** १४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मध्ये वाघरालपाडा येथील वाघरालपाडा नाका ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मध्ये वाघरलपाडा नाका ते मुख्य नाल्यापर्यंत कोणत्याही प्रकारचे गटार बांधलेले नाही. तरी सदर ठिकाणी पावसाळ्यादरम्यान पावसाळी पाणी रस्त्यावर येऊन रस्ता खराब होतो. त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. अशी तक्रार वाघरालपाडा येथील नागरीक वारंवार करतात. तरी वरील बाब लक्षात घेता वाघरालपाडा येथे पाईप गटार बांधणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पाहणी करुन रक्कम रु. ५०३०२४६/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील ९१ मध्ये वाघरालपाडा येथील वाघरालपाडा नाका ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे. | रु. ५०३०२४६/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. ५०३०२४६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

१३/०७

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५८७

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०७/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये लागी पाडा येथील कांचन स्टोर तो गोखिवरे स्मशानभूमी पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी वलीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मध्ये लागी पाडा येथील कांचन स्टोर तो गोखिवरे स्मशानभूमी पर्यंत असलेल्या रस्त्याचे पृष्ठभाग खराब झालेला असून पावसाळी मोसमात रस्त्यावर खड्डे पडतात व त्यामुळे स्थानिक नागरिकांना या रस्त्यावरून प्रवास करण्यास अडथळा निर्माण होतो. अशी तक्रार वारंवार नागरिक करत असतात. तरी प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीचा विचार करता लागी पाडा येथील कांचन स्टोर तो गोखिवरे स्मशानभूमी पर्यंत असलेल्या रास्ता खडीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे.त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रु. २४२१९३८/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव : वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये लागी पाडा येथील कांचन स्टोर तो गोखिवरे स्मशानभूमी पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. कामी रक्कम रु. २४२१९३८/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी.

१३/०७

(अनिल कुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७
ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. ५८८** | **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक : १४/०७/२०२२**

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे लागीपाडा येथील शांती हाइटस ते मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मधील गोखिवरे लागीपाडा येथील शांती हाइटस ते मुख्य रस्त्यापर्यंत कोणतेही प्रकारचे गटार अस्तित्वात नसल्याने सांडपाणी हे जवळील विहिरीत जाऊन पाणी खराब करते व दुर्गंध पसरवते. त्यामुळे नागरीकांना याचा त्रास होत आहे. तरी सदर ठिकाणी पाईप गटार बांधणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पाहणी करून रक्कम रु. ११७२०२६/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे लागीपाडा येथील शांती हाइटस ते मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे. | रु. ११७२०२६/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. ११७२०२६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७
ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५८९

**विभाग :** **बांधकाम विभाग**
**दिनांक :** १४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे येथील गोखिवरे तलाव ते पंजाब नॅशनल बँक पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे येथील गोखिवरे तलाव ते पंजाब नॅशनल बँक येथे पावसाळ्यात तलावाचे पाणी व एव्हरशाईन सीटी कडून येणारे पाणी हे गोखिवरे तलावात जमा होते. सदर तलावाजवळ कोणत्याही प्रकारचे नाले नसल्यामुळे सदरचे पाणी हे रस्त्यावरुन दुसऱ्या ठिकाणी असलेल्या नाल्यात जाते. परंतु रस्त्यावर जमा होणाऱ्या पाण्यामुळे रस्त्याचे नेहमी खचीकरण होऊन नागरीकांना रहदारीस त्रास होतो. तरी सदर ठिकाणी परिस्थितीचा विचार करता आर.सी.सी. नाला बांधणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पाहणी करुन रक्कम रु. १३६८३७८/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वॉर्ड क्र.९१ मध्ये गोखिवरे येथील गोखिवरे तलाव ते पंजाब नॅशनल बँक पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे. | रु. १३६८३७८/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. १३६८३७८/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

१३/०७
(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५८०

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ राजावली वाघरलपाडा येथील मेन रोड तो सोना देवी मंदिर पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ राजावली वाघरलपाडा येथील मेन रोड तो सोना देवी मंदिर पर्यंतचा रस्ता कच्च्या स्वरूपाचा असल्याने पावसाळी मोसमात सदर ठिकाणी पाणी जमा होऊन चिखल निर्माण होते परिणामी वाघरलपाडा येथील नागरिकांना येण्याजाण्यासाठी खूप त्रास होतो व अतिवृष्टीच्या वेळी पूरस्थिती होऊन रस्ता रहदारीकरीता बंद होत असल्याने सदर रस्ता पक्का करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. तरी प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीचा विचार करता राजावली वाघरलपाडा येथील मेन रोड तो सोना देवी मंदिर पर्यंत रस्ता खडीकरणाने व डांबरीकरणाने पक्का करणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू. १,२४,२३,४००/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ राजावली वाघरलपाडा येथील मेन रोड तो सोना देवी मंदिर पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे कामी रक्कम रू. १,२४,२३,४००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी.

13/07

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७
ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५८९

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मध्ये वाघरालपाडा येथील सोनादेवी मंदिर ते राजावली मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मध्ये वाघरलपाडा येथे सोनादेवी मंदीर ते राजावली मुख्य रस्त्यालगत कोणत्याही प्रकारचे गटार व नाला अस्तित्वात नाही. तरी सदर ठिकाणी असलेले रहिवासी यांच्या घरातील सांडपाणी रस्त्यावर सोडले जाते व त्यामुळे दुर्गंधी व रोगराई पसरते. पावसाळी मोसमात पावसाळी पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने पाणी हे रस्त्यावर जमा राहून चिखल निर्माण होतो व त्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. अशी तक्रार वाघरालपाडा येथील नागरीक वारंवार करतात. तरी वरील बाब लक्षात घेता वाघरालपाडा येथे पाईप गटार बांधणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पाहणी करून रक्कम रु. १८२१३२९१/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ९१ मध्ये वाघरालपाडा येथील सोनादेवी मंदिर ते राजावली मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे. | रु. १८२१३२९१/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. १८२१३२९१/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

F/C

पृ-२१

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५८२

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०७/२०२२

| | | |
|---|---|---|
| प्रस्तावाचा विषय | :- | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ राजावली डांबर प्लांट येथील सुविधा मेडिकल ते महादेव नगर नाला पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| प्रस्तावाचा मजकूर | :- | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ राजावली डांबर प्लांट येथील सुविधा मेडिकल ते महादेव नगर नाला पर्यंत रस्ता कच्चा स्वरूपाचा असल्याने पावसाळी मोसमात सदर ठिकाणी पाणी जमा होऊन चिखल निर्माण होते परिणामी डांबर प्लांट व महादेव नगर येथील नागरिकांना येण्याजाण्यासाठी खूप त्रास होतो व अतिवृष्टीच्या वेळी पूरस्थिती होऊन रस्ता रहदारीकरीता बंद होत असल्याने सदर रस्ता पक्का करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. तरी प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीचा विचार करता राजावली डांबर प्लांट येथील सुविधा मेडिकल ते महादेव नगर नाला पर्यंत रस्ता खडीकरणाने व डांबरीकरणाने पक्का करणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.१८७३६१४५/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| ठराव | :- | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ राजावली डांबर प्लांट येथील सुविधा मेडिकल ते महादेव नगर नाला पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. रक्कम रू.१८७३६१४५/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर ई-निविदा प्रसिध्द करण्यात यावी. |

13/07
अनिल कुमार पवार
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पि नं. ४०१३०५**

दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. - ५८३

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- १४/०७/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये खाजगी भागीदारांमार्फत PPP तत्वावर स्मार्ट पोल्स बसविणे कामी ई-निविदा द्वारे एजन्सी निश्चित करुन लघुत्तम दर मंजूर करुन L१ निविदाकारासोबत करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये खाजगी भागीदारांमार्फत PPP तत्वावर स्मार्ट पोल्स बसविणे कामी ई-निविदा द्वारे एजन्सी निश्चित करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. १४०७ दि.३१/०३/२०२२ रोजीच्या मंजूरी अन्वये जा.क्र. वविशम/मा.तं./०५/२२-२३ दि. ०७/०४/२०२२ रोजी अन्वये निविदा प्रसिद्ध करुन दि. ०८/०४/२०२२ ते दि. ०२/०५/२०२२ या कालावधीत ई-निविदा सादर करण्यात आली होती. सदर कालावधीत निविदेसाठी एकच निविदाकार प्राप्त झाल्याने सदर निविदेस दि. १७/०५/२०२२ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतू सदर कालावधीत एकच निविदाकार प्राप्त झाल्याने सदर निविदेस दि. २३/०५/२०२२ पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली होती. सदर कालावधीत देखील एकच निविदाकार प्राप्त झाल्याने निविदा स्पर्धात्मक होण्याच्या दृष्टीने फेर ई-निविदा करुन दि. १०/०६/२०२२ ते दि. १५/०६/२०२२ या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या होत्या. फेर ई-निविदे नंतरही देखील एकाच निविदाकारांने सहभाग घेतला आहे. सदर निविदेचा लखोटा क्र. १ (तांत्रिक बाबींचे लिफाफे) उघडले असता निविदेतील सहभाग घेतलेल्या १ निविदाकारांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असून सदर निविदाकारास पात्र करुन निविदाधारकाचे क्र. २ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. २०/०६/२०२२ रोजी उघडण्यात आले. त्याअनुषंगाने निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | नग | Suyog Telematics Ltd | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रती माहे /प्रती नग रक्कम रु. (सर्व करांसहीत) | प्रती वार्षिक/प्रती नग रक्कम रु. (सर्व करांसहीत) |
| १ | Corporation Rent with raise २.५% every two years | १ | २७००/- | ३२४००.००/- |

१५/०७

उपरोक्त प्रमाणे मे. Suyog Telematics Ltd यांचे दर मंजूर करुन त्यांच्या सोबत संविदा करणेस व कार्यादेश देणेस दि.२९ / ०६ /२०२२ रोजी मा. निविदा समिती सभेत ठेवण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदरचे दर मंजूर करुन निविदाकारा सोबत संविदा करणेस मा.निविदा समिती शिफारस असून मा. प्रशासक तथा आयुक्त सो! यांच्या मंजूरीस्तव सादर.

**<u>ठराव/निर्णय:-</u>** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये खाजगी भागीदारांमार्फत PPP तत्वावर स्मार्ट पोल्स बसविणे कामी ई-निविदा द्वारे एजन्सी निश्चित करणेकामीच्या निविदेतील प्राप्त निविदाकार मे. Suyog Telematics Ltd यांचे प्रती महा प्रती नग रु. २७००/- (Corporation Rent with raise २.५% every two years) इतके दर मंजूर करुन सदरची रक्कम लेखा सांकेतांक क्र. ३४१-४६० जाहीरात परवाना फी व जागा भाडे या लेखाशिर्षा अंतर्गत जमा करणे व सदर निविदाकारा सोबत संविदा करणेस व कार्यादेश देणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१०।७

(अनिलकुमार पवार)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५९८

विभाग : उद्यान
दिनांक :२८/०७/२०२२

---

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- वसई -विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील उद्याने देखभाली करीता नवीन महिला बचत गट नियुक्त करण्याकरीता नव्याने स्वारस्य अभिरूची मागविणे बाबत.

<u>प्रस्तावाचा मजकूर</u> :- उपरोक्त विषय व संदर्भान्वये सादर करणेत येते कि, वसई-विरार शहर महानगरपालिका ९ प्रभाग समिती कार्याक्षेत्रात एकुण १५० उद्याने अस्तित्वात आहेत. सदर उद्यानांचे दैनंदिन व रखवालीचे काम स्थानिक महिला बचतगटा मार्फत करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता व सदर प्रस्तावास मा. सर्वसाधारण ठराव क्र.२२ दि.१८/०६/२०१६ अन्वये सर्वानुमते मान्यता दिल्यानुसार व पारीत करणेत आलेल्या ठरावानुसार उद्यान विभाग व महिला बालकल्याण विभाग यांच्या सहकार्याने उद्यान निहाय बचत गटांना वाटप करण्याची कार्यवाही पूर्ण करणेत आली होती.

वरील निर्णयानुसार नमुद महिला बचत गट यांच्याकडून करारनामा करून खालील प्रमाणे नमुद उद्यानांचे देखभालीचे कामकाज सोपविण्यात आले व देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपलेने त्यांना मा. आयुक्त सो., यांना प्रदान करणेत आलेले अधिकारात मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६ दि.१९/०६/२०१७ अन्वयेच्या निर्णयानुसार सदर महिला बचत गटास पुर्वलक्षी प्रभावाने दि. ०१/०४/२०१७ ते दि. ३१/०३/२०१८ पर्यंत एक वर्षापर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. सदरची एक वर्षाची मुदतवाढ दि.३१/०३/२०१८ रोजी संपल्याने मा. महासभा ठराव क्र.२१ दि.२०/०४/२०१८ च्या निर्णयान्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि.३१/०३/२०१९ पर्यत उद्यान देखभालीचा मुदतवाढीचा कार्यादेश देणेत आलेला होता.

सदर कामाकरिता नियुक्त महिला बचत गट यांना मा.सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०१८ रोजीच्या मुदतवाढीच्या कार्योत्तर मंजुरीच्या ठराव क्र.२१ निर्णयानुसार काही नव्याने विकसित झालेल्या उद्यानांच्या देखभालीकरिता नविन स्थानिक महिला बचत गट नियूक्त करण्यात आले आहेत. पुर्वी कार्यरत असलेल्या महिला बचत गटांस पूर्वलक्षी प्रभावाने दि.३१/०३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर उद्यानांपैकी काही उद्यानांमध्ये नविन स्थानिक महिला बचत गट नियुक्त होईपर्यंत पुर्वी कार्यरत असलेल्या महिला बचत गटांस पुर्वलक्षी प्रभावाने दि.३१/०३/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१७ दि.२०/०८/२०१९ अन्वये उद्याने देखभाल करणेकामी नव्याने स्वारस्य अभिरूची मागविणेत यावी व सदरची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पूर्व कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना मुदतवाढ देण्यात यावी या निर्णयान्वये सन २०१९-२० करीता दि.३१/०३/२०२० पर्यंत उद्यान देखभालीकामी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार खालील नमुद उद्यानांची देखभाल नियुक्ती केलेल्या महिला बचत गटांमार्फत करण्यात येत होती. त्यानंतर सदर महिला बचत गटास संदर्भ क्र.५ नुसार पूर्वलक्षी प्रभावाने दि.०१/०४/२०२० ते दि.३१/०३/२०२१ पर्यंत मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आली होती. तद्नंतर सदर महिला बचत गटास दि.०१/०४/२०२१ ते दि.३० सप्टेंबर २०२१ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने प्रशासकीय ठराव क्र.६४५ दि.०५/१०/२०२१ अन्वये माहे

ऑक्टोबर २०२१ ते माहे मार्च २०२२ पर्यंत उद्यान देखभालीसाठी कार्यरत असलेल्या महिला बचत गट यांना पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देऊन होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आली आहे.

वरील बाबींचे अवलोकन केले असता सन २०१६ पासून ते आजतागयत सन २०२२ पर्यंत पूर्वीपासून कार्यरत असलेले महिला बचत गटास वेळोवेळी मुदतवाढ देऊन देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सलग एका महिला बचत गटाकडे उद्यान देखभालीच्या कामाचा कालावधी (६ वर्ष) इतका झालेला दिसून येत आहे. सदर उद्यान देखभालीबाबत स्थानिक वरिष्ठ नागरीकांचा, पदाधिकारी यांच्या महिला बचत गटांबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. नवीन महिला बचत गटांना संधी उपलब्ध करून देणे योग्य राहील. त्याकरीता नव्याने स्वारस्य अभिरूची सुचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करून स्थानिक इच्छुक महिला बचत गट यांचे अर्ज मागवून देखभालीचे काम देणे देता येईल. सदर प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील महिला बचत गटांमार्फत देखभालीकरीता योग्य असलेली उद्यानांची यादी व प्रतवारीनुसार मासिक मोबदला रक्कमचा तपशिल खालील प्रमाणे.

**तक्ता क्र.१**

**प्रभाग समिती - ए (बोळिंज)**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | वृक्ष नक्षत्र व वनस्पती उद्यान | B | २६,४५०/- |
| २ | मनु तलाव | B | २६,४५०/- |
| ३ | रानपाडा तलाव | B | २६,४५०/- |
| ४ | रानपाडा स्मशानभूमी उद्यान | C | १३,२२५/- |
| ५ | विवा उद्यान, एम. बी. इस्टेट | B | २६,४५०/- |
| ६ | लक्ष्मीऋषी उद्यान | C | १३,२२५/- |
| ७ | रुणवाल विहार (सम्राट व्हिला) उद्यान | C | १३,२२५/- |
| ८ | चाचा नेहरु नारंगी उद्यान | B | २६,४५०/- |
| ९ | कोफराड तलाव | B | २६,४५०/- |
| १० | कमानवाला कॉम्पलेक्स उद्यान | B | २६,४५०/- |
| ११ | सायन्स विज्ञान उद्यान | B | २६,४५०/- |
| १२ | विराट नगर वैकुंठ स्मशान भुमी | B | २६,४५०/- |
| १३ | एकदंत बालउद्यान विराट नगर | B | २६,४५०/- |
| १४ | नारंगी गांव तलाव उद्यान | B | २६,४५०/- |
| १५ | कै. कृ.म. उर्फ बापूजी चौधरी परिक्रमा व बाल उद्यान डोंगरपाडा | B | २६,४५०/- |
| १६ | नानभाट तलाव | B | २६,४५०/- |
| १७ | नागरी आरोग्य केंद्र व उद्यान नारिंगी | B | २६,४५०/- |
| १८ | विराट नगर बालउद्यान चाणक्य चौक | C | १३,२२५/- |
| १९ | बालउद्यान नॅशनल स्कूल मागे | C | १३,२२५/- |
| २० | समर्थ नगर येथिल उद्यान / बोळींज | B | २६,४५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | चिखलडोंगरी परिक्रमा उद्यान | A | ३९,६७५/- |
| २२ | कल्पवृक्ष सोसा., समोरील बालोद्यान | C | १३,२२५/- |
| २३ | भंडारवाडा उद्यान सेंट जेम्स चर्च समोर आगाशी | C | १३,२२५/- |
| २४ | आदर्श शाळेसमोरील उद्यान | C | १३,२२५/- |
| २५ | शंकर मंदिर तलाव | B | २६,४५०/- |
| २६ | राम मंदिर | A | ३९,६७५/- |

**प्रभाग समिती - बी (विरार पुर्व)**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | रानळे तलाव उद्यान | A | ३९,६७५/- |
| २ | वासुदेव वालू पाटील मनवेलपाडा उद्यान | B | २६,४५०/- |
| ३ | तारवाडी रेल्वे ट्रॅक बालोद्यान | B | २६,४५०/- |
| ४ | तारवाडी बाल उद्यान (सुर्यकिरण) | C | १३,२२५/- |
| ५ | मातृछाया गार्डन | C | १३,२२५/- |
| ६ | मनवेलपाडा तलाव | B | २६,४५०/- |
| ७ | मोरेगाव तलाव | B | २६,४५०/- |

**प्रभाग समिती - सी (चंदनसार)**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | वावटेवाडी बालोद्यान / आर. जे. उद्यान | C | १३,२२५/- |
| २ | गोपचरपाडा तलाव उद्यान | B | २६,४५०/- |
| ३ | हिंदू स्मशानभूमी उद्यान | B | २६,४५०/- |
| ४ | दुध दर्या फुलपाडा उद्यान / गुलमोहर उद्यान | B | २६,४५०/- |
| ५ | खडप्या तलाव उद्यान | A | ३९,६७५/- |
| ६ | बर्फेश्वर महादेव उद्यान | A | ३९,६७५/- |

**प्रभाग समिती - डी (आचोळे)**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | महेश पार्क | B | २६,४५०/- |
| २ | आचोळे तलाव | A | ३९,६७५/- |
| ३ | नवघर पूर्व पाण्याची टाकी | C | १३,२२५/- |
| ४ | नवघर पूर्व बस डेपोजवळ | B | २६,४५०/- |
| ५ | नागेला तलाव | A | ३९,६७५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | स्वागत उद्यान | B | २६,४५०/- |
| ७ | एव्हरशाईन सिटी स्मशानभूमी | B | २६,४५०/- |
| ८ | सिरॉक उद्यान | C | १३,२२५/- |
| ९ | पारस उद्यान | B | २६,४५०/- |
| १० | नवघर पूर्व मस्जिदजवळील उद्यान | B | २६,४५०/- |
| ११ | नवघर पूर्व स्मशानभूमी | B | २६,४५०/- |
| १२ | वर्धमान तलाव उद्यान | B | २६,४५०/- |

**प्रभाग समिती - ई नालासोपारा प.**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीबेन छेडा नगर | B | २६,४५०/- |
| २ | शनिमंदिर उद्यान | B | २६,४५०/- |
| ३ | पाटील हॉस्पिटल | B | २६,४५०/- |
| ४ | बाटेला तलाव उद्यान | B | २६,४५०/- |
| ५ | सोपारा उद्यान | B | २६,४५०/- |
| ६ | संयुक्त नगर कालिंदी | B | २६,४५०/- |
| ७ | महात्मा फुले नगर | B | २६,४५०/- |
| ८ | शांती पार्क | B | २६,४५०/- |
| ९ | झालावाड उद्यान | B | २६,४५०/- |
| १० | वृंदावन उद्यान | A+ | ५२,९००/- |
| ११ | टिंकल उद्यान | B | २६,४५०/- |
| १२ | संयुक्त नगर ममता | B | २६,४५०/- |
| १३ | चंद्रेश कुंज | B | २६,४५०/- |
| १४ | अथर्व उद्यान | C | १३,२२५/- |
| १५ | नाना नानी पार्क | C | १३,२२५/- |
| १६ | छेडा नगर खुला रंगमंच उद्यान (नविन विकसित होत आहे) | C | १३,२२५/- |

**प्रभाग समिती - एफ (पेल्हार)**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | धानीव तलाव उद्यान | A | ३९,६७५/- |

**प्रभाग समिती जी (वालीव)**

| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
|---|---|---|---|
| १ | सातिवली तलाव | B | २६,४५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | परेरा नगर उद्यान | A | ३९,६७५/- |
| ३ | वालीव तलाव | A | ३९,६७५/- |
| ४ | जूचंद्र तलाव | A | ३९,६७५/- |
| ५ | मुरुमपाडा उद्यान | C | १३,२२५/- |
| ६ | नाईकपाडा उद्यान | B | २६,४५०/- |
| ७ | सिटीझन उद्यान | B | २६,४५०/- |
| | **प्रभाग समिती एच (नवघर माणिकपूर)** | | |
| **अ.क्र** | **उद्यानांचे नाव** | **उद्यानांची प्रतवारी** | **प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना** |
| १ | दिवाणमान स्मशानभूमी | B | २६४५०/- |
| २ | उमेळमान स्मशानभूमी | B | २६४५०/- |
| ३ | सुर्या उद्यान | B | २६,४५०/- |
| ४ | जॉगर पॉइंट उद्यान | C | १३,२२५/- |
| ५ | के. टी. सरमणी उद्यान | C | १३,२२५/- |
| ६ | गायत्री मंदिरासमोरील उद्यान | C | १३,२२५/- |
| ७ | नरसुळे नाला | C | १३,२२५/- |
| ८ | आनंद नगर उद्यान | B | २६,४५०/- |
| ९ | स्व. किरण गव्हाणकर | C | १३,२२५/- |
| १० | सरदार वल्लभभाई पटेल उद्यान | C | १३,२२५/- |
| ११ | सागर सरिता उद्यान | C | १३,२२५/- |
| १२ | शाहू महाराज उद्यान | C | १३,२२५/- |
| १३ | डी. जी. नगर नाला | C | १३,२२५/- |
| १४ | कै. पद्मण कमळ्या पाटील उद्यान | C | १३,२२५/- |
| १५ | मुक्तीधाम उद्यान | C | १३,२२५/- |
| १६ | नाना नानी पार्क | C | १३,२२५/- |
| १७ | चिमाजी आप्पा उद्यान | C | १३,२२५/- |
| १८ | मीना नगर उद्यान | C | १३,२२५/- |
| १९ | अष्टविनायक उद्यान | C | १३,२२५/- |
| २० | वीर जिजामाता उद्यान | B | २६,४५०/- |
| २१ | ओमकारेश्वर उद्यान | B | २६,४५०/- |
| २२ | किलबिल उद्यान | C | १३,२२५/- |
| २३ | विघ्नेश्वर उद्यान | B | २६,४५०/- |
| २४ | विद्यामंदिर उद्यान | B | २६,४५०/- |
| २५ | सी कॉलनी उद्यान | C | १३,२२५/- |
| २६ | अपना घर मागील बाजूस | C | १३,२२५/- |
| २७ | शांतीवन उद्यान | C | १३,२२५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | विद्यामंदिर पाण्याची टाकी | C | १३,२२५/- |
| २९ | मैत्री पार्क उद्यान | C | १३,२२५/- |
| ३० | बालगोपाळ उद्यान | C | १३,२२५/- |
| ३१ | अशोक उद्यान | C | १३,२२५/- |
| ३२ | नवयुग नगर उद्यान | C | १३,२२५/- |
| ३३ | सुयोग नगर चुळणा बाभोळा तलाव | C | १३,२२५/- |
| ३४ | पूर्वा उद्यान | C | १३,२२५/- |
| ३५ | अपना घर मागील बाजूस | C | १३,२२५/- |
| ३६ | हॅपी कॅसल | C | १३,२२५/- |
| ३७ | साईनगर रंगमंच | B | २६,४५०/- |
| ३८ | के. टी. पार्क | C | १३,२२५/- |
| ३९ | इंदिरा गांधी उद्यान | B | २६,४५०/- |
| ४० | विशाल नगर उद्यान | C | १३,२२५/- |
| ४१ | वसंत उद्यान | C | १३,२२५/- |
| ४२ | तुळजादेवी मंदिर उद्यान | A+ | ५२,९००/- |
| ४३ | तुळजादेवी मंदिर समोरील उद्यान | A+ | ५२,९००/- |
| ४४ | खलाटीपाडा | C | १३,२२५/- |
| ४५ | माणिकपूर पाण्याची टाकी | C | १३,२२५/- |
| ४६ | युनिटी नगर | C | १३,२२५/- |
| ४७ | मणिटेपार उद्यान | C | १३,२२५/- |
| ४८ | चुळणा बाभोळा रोड स्मशानभूमी | C | १३,२२५/- |
| ४९ | कृष्णा टाऊनशिप मैदान | B | २६,४५०/- |
| ५० | चुळणा तलाव | B | २६,४५०/- |
| ५१ | अयप्पा मंदिर नाना नानी पार्क | C | १३,२२५/- |
| प्रभाग समिती आय (वसई गांव) | | | |
| अ.क्र | उद्यानांचे नाव | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मोबदला रक्कम प्रती महिना |
| १ | लोकमान्य टिळक उद्यान प्रभुआळी | B | २६,४५०/- |
| २ | उमेळा हनुमान मंदिर उद्यान | B | २६,४५०/- |
| ३ | उमेळा उद्यान | C | १३,२२५/- |
| ४ | चिमाजी आप्पा किल्ला गार्डन | B | २६,४५०/- |
| ५ | वाल्मिकी मंदिर उद्यान कोळीवाडा | B | २६,४५०/- |
| ६ | पाचूबंदर स्मशानभूमी | B | २६,४५०/- |
| ७ | गिरीज तलाव उद्यान | C | १३,२२५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | उमेळा विभागीय कार्यालयाजवळील उद्यान | C | १३,२२५/- |
| ९ | पी. कवळी बिल्डर उद्यान कोळीवाडा | C | १३,२२५/- |
| १० | वसई कोर्ट नाका जवळील उद्यान | C | १३,२२५/- |
| ११ | बेणापट्टी स्मशानभूमी | B | २६,४५०/- |
| १२ | तामतलाव उद्यान | A+ | ५२,९००/- |
| १३ | हुतात्मा बाळा सावंत उद्यान, पापडी | B | २६,४५०/- |
| १४ | नायगांव अमोल नगर उद्यान | B | २६,४५०/- |
| १५ | नायगांव मरियम नगर उद्यान | B | २६,४५०/- |
| १६ | विजय पार्क नायगांव | B | २६,४५०/- |
| १७ | वाल्मिकेश्वर मंदिर उद्यान नायगांव | C | १३,२२५/- |
| १८ | नाना नानी पार्क, गिरीज | C | १३,२२५/- |
| १९ | चोबारे तलाव | A | ३९,६७५/- |

| तक्ता क्र. ३ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | उद्यानांची प्रतवारी | प्रतवारी नुसार मासिक मोबदला रक्कम रु. | प्रतवारी प्रमाणे उद्यानांची संख्या | मासिक खर्च रक्कम रु. | वार्षिक खर्च रक्कम रु. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | A+ | ५२,९०० | ४ | २,११,६००/- | २५,३९,२००/- |
| २ | A | ३९,६७५ | १२ | ४,७६,१०० /- | ५७,१३,२००/- |
| ३ | B | २६,४५० | ६८ | १७,९८,६००/- | २,१५,८३,२०० /- |
| ४ | C | १३,२२५ | ६१ | ८,०६,७२५/- | ९६,८०,७००/- |
| | | | १४५ | एकूण | ३,९५,१६,३००/- |

वरील तक्ता क्र.२ व ३ नुसार महिला बचत गटांना देण्यात येणा-या उद्यानांच्या प्रतवारीनुसार उद्यान देखभालीकामी सन २०२२ - २०२३ करिता रक्कम रु.३,९५,१६,३००/- (अक्षरी- तीन कोटी पंच्याान्नव लक्ष सोळा हजार तीनशे रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरकामी होणारा खर्च लेखाशिर्षक-वृक्षरोपण/उद्यान देखाभाल (लेखा संकेतांक क्रमांक-५५१-२४९०-१) मंजूर तरतुद रक्कम रुपये रु.६,००,००,०००/-(अक्षरी -सहा कोटी रुपये मात्र) मधून भागविता येईल.

सदर माहे मार्च,२०२२ पर्यत महिला बचत गट यांना उद्यान देखभाली करिता देण्यात आलेल्या मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात येणेपूर्वी उद्यान देखभाल कामाकरीता स्वारस्य अभिरुची मागविणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने स्वारस्य अभिरुची प्रक्रिया होईपर्यंत कार्यरत असलेल्या महिला बचत गटांना मुदतवाढ देणे योग्य राहील.

तरी, सन २०२२-२३ करिता बचत गटामार्फत उद्यान देखभालीकामी येणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रू.३,९५,१६,३००/- (अक्षरी- तीन कोटी पंच्यान्नव लक्ष सोळा हजार तीनशे रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी तसेच स्वारस्य अभिरूची मागविणेस सदरचा प्रस्ताव पुढील मान्यतेस्तव सादर.

<u>**ठराव**</u> **:-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ९ प्रभाग समिती अंतर्गत असलेली १५० उद्यानांपैकी १४५ उद्याने महिला बचत गटांमार्फत देखभाल करणेकामी स्वारस्य अभिरूची सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच स्वारस्य अभिरूची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत माहे जुलै २०२२ पर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर उद्यान देखभालीकरीता होणारा अंदाजीत खर्च रक्कम रू.३,९५,१६,३००/- (अक्षरी - तीन कोटी पंच्याण्णव लक्ष सोळा हजार तीनशे रुपये मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेत येत आहे.

१५/०७

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर
पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५८५ दिनांक :-१४/७/ २०२२

---

**प्रस्तावाचा विषयः- प्रभाग समिती - एफ, पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४४ मध्ये नालासोपारा मुख्य रस्ता येथे बनारसी हॉटेलच्या मागे क्रॉसिंग (बॉक्स कल्वर्ट) करणे. कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर** - सादर करण्यात येते ,वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातिल प्रभाग समिती एफ पेल्हार येथे एकुण १३ प्रभाग आहेत. तरी सदर प्रभागांची व्याप्ती व विस्तार हा मोठ्या प्रमाणात होत आहे.त्यामुळे तेथिल विकास कामे करण्यासाठी तेथिल नागरीकांच्या वारंवार सुचना व मागणी करत असतात.

तरी **प्रभाग समिती - एफ, पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४४ मध्ये नालासोपारा मुख्य रस्ता येथे बनारसी हॉटेलच्या मागे क्रॉसिंग (बॉक्स कल्वर्ट) करणे.** सदर काम तातडीने करने आवश्यक आहे कारण तसेच सदर ठिकाणी गटार आहे परंतु क्रॉसिग नसल्यामुळे संपुर्ण पाणी हे रस्त्यावर येते त्यामुळे रहदारीसाठी नागरीकांना त्रास होतो त्यामुळे गटार क्रॉसिंग करणे गरजेचे आहे .

| | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **प्रभाग समिती - एफ, पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ४४ मध्ये नालासोपारा मुख्य रस्ता येथे बनारसी हॉटेलच्या मागे क्रॉसिंग (बॉक्स कल्वर्ट) करणे.** | रु - ४७,६६,६२२/- |

सोबत सदर विकास कामे करण्यासाठी होणा-या खर्चाचे अंदाजपत्रक जोडले आहे व त्याची अंदाजे रक्कम ४७,६६,६२२/- इतका होणार आहे. सदर कामी मान्यता घेवुन अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त करुन निविदा मागवुन कार्यवाही करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर सदर कामाचा खर्च " इतर विकास कामे " या लेखाशिर्षकातील रक्कम रु. ४०,००,००,०००/- या लेखाशिर्षक अंतर्गत भागविण्यात येणार आहे .

कामाचे स्वरुप -

१.क्रॉसिंगची लांबी - २२.०० मीटर
२. क्रॉसिंगची रुंदी -६.०० मीटर
३.क्रॉसिंगची उंची- ३.०० मीटर

अर्थसंकल्पीय तरतुद -

१.लेखाशिर्ष- इतर विकास कामे
२.मुळ तरतुद - ४०,००,००,०००/-
३.या प्रस्तावाचा खर्च- ४७,६६,६२२/-
४.उपलब्ध शिल्लक- २५,६३,३१,७३८/-

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 \ manjuri.docx218

वर नमुद केलेले काम तातडीने करणे आवश्यक आहे. याकरीता सदर कामाचे २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे जिल्हा दर सुचिनुसार एकुण रक्कम रु-४७,६६,६२२/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

सदर कामाची स्थावर मालमत्ता नोंदवही पृष्ठ क्र. अ.क्र. वर नोंद घेतली आहे

या कामी होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील इतर विकास कामे या लेखाशिर्षकातील रक्कम रु - ४०,००,००,००० /- तरतुद मधुन भागविण्यात येईल सबब उपरोक्त प्रभाग समिती एफ पेल्हार अखत्यारितीत येणा-या बांधकाम विभागा अंतर्गत कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्याता मिळावी .तसेच सदर कामी जाहीर ई निविदा प्रसिध्दी करणे कामी ही मान्यता मिळावी ही विनंती.

ठराव - सबब वसई विरार शहरमहानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती एफ पेल्हार मधील प्रभाग क्र. **४४ मध्ये नालासोपारा मुख्य रस्ता येथे बनारसी हॉटेलच्या मागे क्रॉसिंग (बॉक्स कल्वर्ट) करणेकामी** तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ४७,६६,६२२/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

27/06/22

(अनिलकुमार पवार)
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 manjuri.docx219

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५९६ | विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १४/०७/2022

विषय :-विरार (पू) वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील फुलपाडा येथिल जलतरण तलाव येथे दुरुस्तीची कामे करणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :-विरार (पू) वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील फुलपाडा येथिल जलतरण तलाव येथे दुरुस्तीची कामे करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३२,४३,३८२/-

प्रस्तावाची गरज :- विरार (पू) वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील फुलपाडा येथे जलतरण तलाव अस्तित्वात आहे. सदर जलतरण तलाव कोवीड-१९ च्या काळात बंद ठेवण्यात आलेला होता. जलतरण तलाव सरावाकरिता सुरु करणेबाबत मा.आयुक्त सो.हयांनी सुचना केलेल्या आहेत.

सदर जलतरण तलावामधील शौचालय, चेंजिग रुम, शॉवर रुम नादुरुस्त अवस्थेत आहेत. सदर दुरुस्तीचे कामे करणे आवश्यक आहे. तशा सुचना मा.उप आयुक्त हयांनी दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने जलतरण तलावासाठी लागणाऱ्या काही बाबी राज्य दरसुची मध्ये समाविष्ट नसल्याने बाजारभावानुसार दरपत्रक मागविलेले आहेत व राज्यदरसुची २०२१-२२ नुसार रक्कम रु.३२,४३,३८२/- इतक्या किंमतींचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे.

कामाचे स्वरुप :- रंगकाम, लाद्या,प्लास्टर , दरवाजे, मोटर बसविणे

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम ७ ते ८ वर्षांपूर्वी करण्यात आले आहे.

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :- --

अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- इतर विकास कामे

ब) मुळ तरतूद :- ४०,००,००,००० /-

क) शिल्लक :- १६,४१,३७,७८३ /-

ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र.०१ पृष्ठ क्र. २७

अ.क्र. १७

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६३ व ६६ अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव :-** विरार (पू) वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील फुलपाडा येथिल जलतरण तलाव येथे दुरुस्तीची कामे करणेकरीता कामी चालू राज्य दरसुची २१-२२ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.३२,४३,३८२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ व ६६ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

05/07

(अनिलकुमार पवार)

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसइ - विरार शहर महानगरपालिका**
मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५८७ | विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :१४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :-विरार पू.११ मध्ये कोकण नगर ते कोकण निवास पर्यंत आरसीसी नाल्याचे बांधकाम करणेयाकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४३,२५,२१९/-
प्रशासकीय मंजूरी :- मा.आयुक्त, ठराव क्र.१११० दि.१४/०२/२०२२
तांत्रिक मान्यता :- मा.शहर अभियंता, दि.०८/०३/२०२२
ई- टेण्डरींग व्दारे मूळ ई-निविदा प्रसिध्दी:-व.वि.श.म./बांध/प्रससी/१५/२२, दि.११/०४/२०२२
प्रथम फेर ई निविदा प्रसिध्दी :-व.वि.श.म./बांध/मुख्यालय/१२४/२२, दि.२८/०४/२०२२
वृत्तपत्रातील मूळ ई- निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.१३/०४/२०२२
वृत्तपत्रातीलप्रथम फेर -ई निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि.२९/०४/२०२२

वृत्तपत्राचे नाव (मूळ निविदा) :- १)दै.लोकमत २)दै.आमची मुंबई ३) दै. इंडियन एक्सप्रेस
वृत्तपत्राचे नाव (प्रथम फेर-ई निविदा):- १)दै.सकाळ २)दै.वृत्तमानस ३)दै. फ्री प्रेस जर्नल
ई - टेण्डरींग व्दारे मूळ निविदा प्रिपरेशनची तारीख :-दि.१३/०४/२०२२पासून ते दि.२७/०४/२०२२ दु.३.०० पर्यत
प्रथम फेर ई निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि.२९/०४/२०२२ पासून ते दि.०६/०५/२०२२ दु.३.०० पर्यत
ई - टेण्डरींग व्दारे मूळ निविदा स्विकारण्याची तारीख:-दि.२९/०४/२०२२ दु.३.०१ पर्यत
ई - टेण्डरींग व्दारे प्रथम फेर ई निविदा स्विकारण्याची तारीख:- दि.०९/०५/२०२२ दु.३.०१ पर्यत
ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.०९/०५/२०२२
[द्वितीय लखोटा] :- दि.०८/०६/२०२२

प्राप्त निविदांची संख्या :- ५
प्रथम लखोटा छाननीअंती पात्र निविदाधारकांची संख्या :- ३
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा.कार्यकारी तथा प्र.शहर अभियंता
प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र | निविदा धारकाचे - नांव | निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षो | निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरीटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.शशिकांत सुधाकरराव राजहंस | ३१.९९% जास्त दराने | -- | L३ |
| २. | मे.समीर कन्स्ट्रक्शन | ४.९९% जास्त दराने | -- | L२ |
| ३. | मे.इरा एंटरप्रायजेस | -१३.३३% कमी दराने | FDR No.८३९०२५ दि.१६/०६/२०२२ | L१ |

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे.इरा एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकापेक्षा १३.३३% कमी दर** तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

सदर विषयावर **दि.** २३/०६/२०२२ रोजीच्या निविदा सभेत सविस्तर चर्चा करणेत आली असता **मे.इरा एंटरप्रायजेस** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा १३.३३% कमी** निविदेस शिफारस करणेत आलेली आहे. तसेच अंदाजपत्राकापेक्षा कमी दराची निविदा असल्याने **मे.मे.इरा एंटरप्रायजेस** यांचे मार्फत सदर कामासाठी **रु.१,८७,३००/-** रक्कमेचा परफॉर्मन्स सिक्युरीटी FDR **क्र.** ८३९०२५ **व्दारे दि.** १६/०२/२०२२ रोजी मनपा फंडात जमा करणेत आलेला आहे.

तरी **मे.इरा एंटरप्रायजेस** यांची १३.३३% **कमी दराची निविदा इतर निविदांच्या** तुलनेत कमी, योग्य व वाजवी आहे सदर कमी दराच्या निविदेस निविदा समितीने शिफारस केली असल्याने सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर. त्याचप्रमाणे निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेकरिता मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव** :-विरार पू.११ मध्ये कोकण नगर ते कोकण निवास पर्यंत आरसीसी नाल्याचे बांधकाम करणे या कामी सहभागी झालेल्या निविदाधारकांपैकी लघुत्तम निविदाधारक **मे.इरा एंटरप्रायजेस** हयांची १३.३३% **कमी दराची** निविदा मंजुर करणेत येत असून लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणे तसेच करारनामा कार्यादेश देणेच्या पुढील अनुषंगिक कार्यवाही करीता मान्यता देण्यात येत आहे.

१५/०७

(अनिलकुमार पवार)

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

ठराव क्र. ५९८

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :१९/०७/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) यशवंतनगर येथील परिवहन सेवेसाठी बसडेपो व नवीन प्रशासकीय इमारतीसाठी फर्निचरचे काम करणेकामी GEM गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसच्या माध्यमातून ऑनलाईन प्रक्रियेद्वारे खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) यशवंत नगर येथील परिवहन सेवेसाठी बसडेपो व नविन प्रशासकीय इमारतीचे काम पुर्णत्वात येत आहे.

सदर इमारतीमध्ये परिवहन सेवेसाठी बसडेपो (G+२) व नवीन प्रशासकीय कार्यालयासाठी (G +७) मजल्यापर्यत बांधकामाचे नियोजन आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेची जुनी इमारत अधिकारी/कर्मचारी यांना बसण्याकरीता अपुरी पडत आहे.पावसाळ्यात सदर इमारतीत गळती होत असल्याने अधिकारी, कर्मचारी व नागरीकांची गैरसोय होत आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभा सभागृह, मा.स्थायी समिती सभागृह व नगररचना विभाग येथे ही गळतीचे प्रमाण जास्त असल्याने महानगरपालिकेच्या नवीन इमारतीत स्थलांतर करणे आवश्यक आहे.

नविन प्रशासकीय इमारती अंतर्गत फर्निचरचे काम करणेसाठी रक्कम रु. ५१,०३,२१,८१५/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामामध्ये मा. सर्वसाधारण सभा सभागृह, मा. स्थायी समिती सभागृह, मा.अधिकाऱ्यांची दालने व कर्मचाऱ्यांसाठी बैठक व्यवस्था यामध्ये टेबल, खुर्च्या, कार्पेट, सी. सी. टिव्ही कॅमेरी, पेन्टींग्स अंतर्गत सजावट इत्यादीचा समावेश आहे.

सदर काम तातडीने करावयाचे असल्याने शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. संकिर्ण - २०१६ / प्र.क्र.२१५ / उद्योग-४ दि. २४/०८/२०१७ नुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवरुन खरेदी करणे शक्य आहे.

सदर कामाचा खर्च "प्रशासकिय इमारत बांधकाम" या लेखाशिर्षांतर्गत भागविण्यात येणार आहे.

लेखाशिर्ष :- "प्रशासकिय इमारत बांधकाम"

प्रस्तावित खर्च :- रु. ५१,०३,२१,८१५/-

महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग-४ दि. २४/०८/२०१७ नुसार केंद्र शासनाने विकसीत केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टलची कार्यपध्दती, राज्य शासनास वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी स्विकृत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. खरेदीदार विभागास गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वस्तू व सेवांची खरेदी करणेची तरतुद आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ५ मध्ये त्याबाबत सविस्तर कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे.

सदर तरतुदीनुसार गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टल व्दारे खरेदी करणे व होणाऱ्या एकुण खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधि. १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) यशवंतनगर येथील परिवहन सेवेसाठी बसडेपो व नवीन प्रशासकीय इमारतीसाठी फर्निचरचे काम करणे कामी ई-मार्केटप्लेस (GEM) पोर्टल व्दारे खरेदी करणे कामी व होणाऱ्या खर्च रक्कम रु. ५१,०३,२१,८१५/- इतक्या रक्कमेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

१७/०७

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर
पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र . ५८८** दिनांक :-१८/७/ २०२२

---

**प्रस्तावाचा विषय:- प्रभाग समिती एफ पेल्हार मधील प्रभाग क्र. ४४ मध्ये वालईपाडा येथील रोहन पाटील यांचे घर ते दुर्गा मंदिर पर्यत(दोन्ही बाजुस) आर.सी.सी पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकुर -** सादर करण्यात येते की, प्रभाग समिती एफ पेल्हार मधील संतोष भुवन येथील वालईपाडा हा सदर रस्ता हा नालासोपारा फाटा ते नालासोपारा स्टेशन मुख्य रस्ता याला जोडणारा रस्ता आहे

प्रस्तावाच मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र १०५ मध्ये जूचंद्र येथील परेरनगर स्मशानभूमी ते मुख्य नाल्यापर्यंतचा नाला हा सदर परिसरातील मुख्य नाला आहे. परंतू त्या ठिकाणी अस्तित्वात असलेला नाला हा अतिशय अरुंद स्वरूपाचा असून सदर नाल्याची खोली खूप कमी आहे. त्यामुळ सदर परिसरातील सांडपाणी व पावसाळयामध्ये जमा होणाऱ्या पाण्याचा निचरा होत नसल्याने लगतचा परिसर मोठ्या प्रमाणात जलमय होतो. त्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते. सदर ठिकाणी पक्या स्वरूपाचा नाला बांधला असता पाण्याचा योग्यरीतीने निचरा होण्यास मदत होईल. त्यामुळे सदर ठिकाणी आर.सी.सी नाला बांधणे आवश्यक आहे.

त्याकरीत जागेची पाहणी करून रक्कम रु. ६६,४६,२७७/- चे सन २०२१-२२ च्या वितीत वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र १०५ मध्ये जूचंद्र येथील परेरनगर स्मशानभूमी ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी नाला बांधणे कामी रक्कम रु. ६६,४६,२७७/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वितीय मान्यता देण्यात येत आहे.

20/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ६७६

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :-२०/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.७५ मध्ये सातिवली पायधुनी नाका येथे एव्हरलास्ट इंड. ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मध्ये सातिवली पायधुनी नाका येथे एव्हरलास्ट इंड. ते मुख्य नाल्यापर्यंत ग्रामपंचायत कालिन एक फुटाचे सी.सी. गटार आहे. सदरचे गटार हे संपूर्णपणे नादुरुस्त व अरुंद आहे. सदरच्या गटारात पाण्याचा निचरा होत नसल्याने सांडपाणी गटारात साचून राहून रस्त्यावर पसरते त्यामुळे स्थानिक नागरीकांना असुविधा होत असते. सदर साचलेल्या सांडपाण्यामुळे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही नागरीकांच्या सुविधेसाठी गटार करणे आवश्यक आहे. सबब या ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१/२२ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरीता रक्कत रु. २४,२१,१२६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.७५ मध्ये सातिवली पायधुनी नाका येथे एव्हरलास्ट इंड. ते मुख्य नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे. | रु. २४,२१,१२६/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. २४,२१,१२६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

१५/०७

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 617 **विभाग : बांधकाम विभाग**

**दिनांक :** 20/07/2022

---

| | |
|---|---|
| मुख्य प्रस्तावाचा विषय :- | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वॉर्ड क्र.७६ मध्ये नाई कपाडा येथे चामुंडेश्वरी इंड. ते मेन नाल्यापर्यंत पाईप गटार बांधणे कामी प्रप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करून समविदा करण्यास मान्यता मिळाणेबाबत. (Tender Id no. 2019-vvcmc-510293-1) |
| मुख्य प्रस्तावाचा मजकूर | |

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम:- | रू.१५,९६,१३५/-(पाईप वगळून १२,५५,४३५/-) |
| प्रशासकीय मंजूरी :- | मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २४३ दि. ०२/०५/२०१७ |
| ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- | वविशम/बांध/ |
| वृत्तपत्रातील प्रथमवेळ जाहिर निविदा :- ई-टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्द | |
| वृत्तपत्रातील द्वितीयवेळ फेर निविदा:- | जा.क्र.वविशम/काअ/बांध/७१८/२०१९ दि.१३/११/२०१९ दै.लोकमत, दै.फ्रि प्रेस जर्नल, दै.हिंदमाता मिरर. दै.१९/११/२०१९ |
| ई-टेंडरींगद्वारे निविदा उघ्डण्याची :- दिनांक (प्रथम लखोटा) | दि.१०/१२/२०१९ |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे:- प्राप्त विविदा | ०३ |
| ई-टेंडरींगद्वारे निविदा उघ्डण्याची :- (द्वितीय लखोटा) | दि.२२/०१/२०२० |
| प्राप्त निविदा उघडणारे:- अधिकारी:- | मा.कार्यकारी अभियंता |

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा | निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | **मे.सी.एस. मोहीते** | **(-)२०.५०%** | डि.डि.पावती क्र.३५६२५२. दि.०४/०३/२०२० | |
| २ | मे.परमेश्वरी एंन्टरप्रायझेस | (-)१७.७९% | -- | |
| ३ | मे.भालेश्वर एंन्टरप्रायझेस | (-)१७.२१% | -- | |

निर्णय :- सदर विषयाबाबत निविदा सभेत चर्चा करण्यात आली. सदर कामी ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ०३ पैकी सर्व निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त् ०३ पैकी सर्व निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक मे.सी.एस. मोहीते यांच्या (-) २०.५०% कमी दराच्या निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणे तसेच त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

१५/०७

(अनिलकुमार पवार)

आयुक्त तथा प्रशासक

वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई — विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी — 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् — 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 618 | **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक :** 20/07/2022

---

| | | |
|---|---|---|
| प्रस्तावाचा विषय | :- | प्रभाग समिती (सी) कार्यक्षेत्रातील विरार (पू) येथील जिवदानी क्रिकेट मैदानाची तीन वर्षाकरीता देखभाल व व्यवस्थापन करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |

प्रस्तावाचा मजकूर

विरार (पू) येथील जिवदानी क्रिकेट मैदान हे वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रमुख मैदानापैकी एक आहे. सदर मैदानाचे सुशोभिकरणाचे काम पूर्ण झालेले असून या ठिकाणी 'लॉन' चे काम अंतर्भूत होते. सदर मैदानावर क्रिकेटचे सामने भरविण्यात येत असलेने या मैदानाची देखभाल वेळोवेळी करणे गरजेचे आहे. जेणेकरून हे मैदान सुस्थितीत ठेवता येईल. सद्यस्थितीत तेथे पावसाळयादरम्यान मोठे गवत उगवलेले असते. सदर जिवदानी क्रिकेट मैदानाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

१. मैदान क्षेत्र - २३६९० चौ.मी.
२. लॉनचे क्षेत्र - ११९७० चौ.मी.
३. पाणी साठवून टाकी - ४०००० लिटर्स
४. स्प्रिंकलर्सची व्यवस्था - आहे.

वरील सर्व सुविधांची देखभाल व दुरूस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता माळी, मजूर, सुरक्षा रक्षक, लाल माती यांचा वापर करावा लागणार आहे. सदर कामाचा दि.१२/०८/२०२१ रोजी कार्यादेश दिला असून कामाची मूदत दि.११/०८/२०२२ रोजी संपणार आहे. सदर व्यवस्थापन जर तीन वर्षांसाठी केले तर प्रशासकीय दृष्टीने ते सोयीचे ठरेल. सोबत कामाचे अंदापत्रक जोडले असून यानुसार तीन वर्षांकरीता अपेक्षीत खर्च रू.१,२२,९३,४९६/- रोजी इतका आहे.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम — | :- | रू. १,२२,९३,४९६/- |
| कामाचे स्वरूप | :- | जिवदानी क्रिकेट मैदानाची दैंनदीन साफसफाई, गवत छाटणी, देखभाल/ व्यवस्थापन इ. स्वरूपाची कामे. |
| मालकी | :- | व.वि.श.म. |

| | | |
|---|---|---|
| खडयातील आरक्षण | :- | अ) लेखाशिर्ष — क्रिडांगण व देखभाल व्यवस्था (५ % क्रिडा राखीव तरतूद)<br>ब) मुळतरतुद- रू. 55,00,000-/<br>क) शिल्ल्क - रू. 33,52,000/-<br>ड) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र.1 पृष्ठ क्र. 74 अं. क्र. 1 |

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

| | | |
|---|---|---|
| ठराव | :- | प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील जिवदानी क्रिकेट मैदानाची तीन वर्षाकरीता देखभाल व व्यवस्थापन करणे कामी रू. १,२२,९३,४९६/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय मंजूरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने 2022-23 या वर्षामध्ये होणाऱ्या रु.२३,९०,४०२/- इतक्या खर्चास तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामाची निविदा मागविणेत यावी. |

२०।०८

(अनिलकुमार पवार)

आयुक्त तथा प्रशासक

वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

**निविदा दर मंजूरी ठराव क्र. ६७९** दिनांक : २५/०७/२०२२

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय** :- विरार (प.) प्रभाग क्र.४ मध्ये नारिंगी फाटक रोड सद्गुरु बंगल्याजवळ आरक्षित नाल्यावर आर.सी.सी. कल्वर्ट बांधणे. (फेर निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर** :-

| | |
|---|---|
| १) अंदाजपत्रकीय रक्कम | :- रु.२०,१३,८९२/- |
| २) प्रशासकीय मंजूरी | :- मा.स्थायी समिती विषय क्र.५७० दि.२८/२/२०२० |
| ३) तांत्रिक मान्यता | :- कार्यकारी अभियंता दि.२८/२/२०२० |
| ४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. | :- रु.२०,१३,८९२/- |
| ५) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी | :- वविशम/का.अ/बांध/१५६३/२०२१ दि.२८/१/२०२० कार्यकारी अभियंता, व.वि.श.म. |
| ६) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक | :- दि.३०/०१/२०२० |
| ७) जाहिर निविदा सुचना | :- १) दै.लोकमत २) दै.मिड-डे ३) दै.पूर्णविराम |
| ८) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी (फेर निविदा) | :- वविशम/का.अ/बांध/४९६/२०२१ दि.१८/३/२०२१ कार्यकारी तथा शहर अभियंता, व.वि.श.म. |
| ९) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक | :- दि.१९/०३/२०२१ |
| १०) जाहिर निविदा सुचना | :- १) दै.मुंबई चौफेर २) दै.सकाळ ३) दै.वृत्तमानस ४) दै.खबरें आज तक ५) दै.प्रात:काल ६) दै.स्टॅण्डर्ड पोस्ट ७) दै.इंडियन एक्सप्रेस |
| ११) फेर ई – निविदा (प्रथम मुदतवाढ) | :- वविशम/सार्व.बांध/श.अ/बांध/६०७/२०२१ दि.६/४/२०२१ शहर अभियंता, व.वि.श.म. |
| १२) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक | :- दि.०७/०४/२०२१ |
| १३) जाहिर निविदा सुचना | :- १) दै.मुंबई चौफेर २) दै.सकाळ ३) दै.वृत्तमानस ४) दै.खबरें आज तक ५) दै.प्रात:काल ६) दै.स्टॅण्डर्ड पोस्ट ७) दै.इंडियन एक्सप्रेस |
| १४) फेर ई – निविदा (द्वितीय मुदतवाढ) | :- वविशम/सार्व.बांध/श.अ/बांध/६२७/२०२१ दि.१५/४/२०२१ शहर अभियंता, व.वि.श.म. |
| १५) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक | :- दि.१६/०४/२०२१ |
| १६) जाहिर निविदा सुचना | :- १) दै.मुंबई चौफेर २) दै.सकाळ ३) दै.वृत्तमानस ४) दै.खबरें आज तक ५) दै.प्रात:काल ६) दै.स्टॅण्डर्ड पोस्ट ७) दै.इंडियन एक्सप्रेस |
| १७) ई-निविदा प्राप्त | :- ३ |
| १८) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) | :- दि.२३/४/२०२१ |
| १९) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) | :- दि.१०/०६/२०२२ |
| २०) प्राप्त निविदांची संख्या | :- ३ |

२१) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे.साई पोमू कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | पात्र |
| २. | मे.सुनिल हिरालाल राठोड | अंदाजपत्रकापेक्षा २.००% जास्त दराने | पात्र |
| ३. | मे.अभय बी. जाधव | अंदाजपत्रकापेक्षा ०.१५% जास्त दराने | पात्र |

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेले दर **मे.साई पोमू कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दराने** निविदा ही कमी असून योग्य व वाजवी आहे.

तरी **अंदाजपत्रकीय दराने** मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव / निर्णय :-**

विरार (प.) प्रभाग क्र.४ मध्ये नारिंगी फाटक रोड सद्गुरु बंगल्याजवळ आरक्षित नाल्यावर आर.सी.सी. कल्वर्ट बांधणे (फेर निविदा) या कामास **मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५७० दि.२७/२/२०२०** अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.साई पोमू कंन्स्ट्रक्शन** ह्यांचे **अंदाजपत्रकीय दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.साई पोमू कंन्स्ट्रक्शन** ह्यांना **अंदाजपत्रकीय दराने** काम करणेस, कार्यादेश देणेस, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

२०/७

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई — विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## सार्वजनिक वाचनालय

**प्रशासकीय ठराव क्र.** ६२० **दिनांक -** २५/०७/२०२२

विषय ः- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ४ सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथांवर व कपाटांवर जंतूनाशक औषध फवारणी (पेस्ट कंट्रोलिंग) करणेकामी प्राप्त झालेली दरपत्रकातील दराना प्रशासकीय मंजूरी देऊन संविदा करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** - वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ४ सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथांवर व कपाटांवर जंतूनाशक औषध फवारणी (पेस्ट कंट्रोलिंग) करणेकामी दि.२४/०६/२०२२ रोजी जाहिर दरपत्रक सुचना महानगरपालिकेच्या संकेत स्थळ, सर्व प्रभाग समिती कार्यालये, मुख्यालय व ४ सार्वजनिक वाचनालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून सिलबंद दरपत्रके दि.०४/०७/२०२२ पर्यत मागविण्यात आलेली होती. सदर विहीत मुदतीत एकूण ०४ संस्था व व्याक्तीचे लिफाफे प्राप्त झालेले असून सदर प्राप्त लिफाफे दि.०८/०७/२०२२ दु. ३.०० वाजता उघडण्यात आले. उघडण्यात आलेल्या दरपत्रकामधील प्राप्त दरांचा तपशील खालीलप्रमाणेआहे.

| अ.क्र | दरपत्रक धारकाचे नाव | आधारकार्ड छायांकित प्रत होय/नाही | पॅनकार्ड छायांकित प्रत होय/नाही | वस्तु व सेवाकर छायांकित प्रत (जी.एस.टी) होय/नाही | जंतूनाशक औषध फवारणीचे (पेस्ट कंट्रोलिंग) सर्व करासहीत दर रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | इंडिया पेस्ट मॅनेजमेंट सर्विस | **होय** | **होय** | **होय** | **५४,०४४/- (३ सर्विस)** |
| २. | जी.डी पेस्ट कंट्रोल | होय | होय | होय | ४०,०००/- |
| ३. | अल्टीमा सर्च | होय | होय | होय | २,१८,३००/- (१ सर्विस) |
| ४. | प्रदिप वेखंडे | होय | होय | होय | २,०५,३३०/- (३ सर्विस) |

वरीलप्रमाणे उघडण्यात आलेल्या दरपत्रकांची पडताळणी केली असून प्राप्त झालेल्या दरापैकी अ.क्र. २ मे. जी.डी पेस्ट कंट्रोल यांचे दर रू.४०,०००/- इतके असून वर्षभरात करण्यात येणा-या जंतूनाशक औषध फवारणीच्या सेवांचा तपशिल नमुद केलेला नाही. तर अ.क्र. १ **मे. इंडिया पेस्ट मॅनेजमेंट सर्विस** यांचे दरपत्रकात रू.५४,०४४/- (रूपये चोपन्न हजार चव्वेचाळीस रूपये मात्र) इतके दर असून वर्षभरात ३ वेळा (३ सर्विस)जंतूनाशक औषध फवारणी करण्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. त्यामूळे अ.क्र. १ मे. इंडिया पेस्ट मॅनेजमेंट सर्विस यांचे नमूद केलेल्या दरामुळे महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. तरी सदरकामी प्राप्त झालेल्या मे. इंडिया पेस्ट मॅनेजमेंट सर्विस यांचे महानगरपालिकेच्य ४ सार्वजनिक वाचनालयातील २६५ कपाटांतील १०१८२७ पुस्तकांसाठी जंतूनाशक औषध फवारणी करणेकामी प्राप्त दरपत्रकातील नमूद दर रू.५४,०४४/- (रूपये चोपन्न हजार चव्वेचाळीस रूपये मात्र) ह्या दरांस मंजूरी देऊन व त्यांचे समवेत संविदा करून कार्यादेश देणेकमी पुढील मान्यतेस्तव सादर.

<u>**प्रस्तावाचा निर्णय / ठराव**</u> - वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ४ सार्वजनिक वाचनालयातील ग्रंथांवर व कपाटांवर जंतूनाशक औषध फवारणी (पेस्ट कंट्रोलिंग) करणेकामी वरीलप्रमाणे प्राप्त ०४ दरपत्रकापैकी अ.क्र. १ मे. इंडिया पेस्ट मॅनेजमेंट सर्विस यांचे नमूद केलेल्या दरामुळे महानगरपालिकेचा फायदा होणार आहे. तरी सदरकामी प्राप्त झालेल्या **मे. इंडिया पेस्ट मॅनेजमेंट सर्विस** यांचे महानगरपालिकेच्या ४ सार्वजनिक वाचनालयातील २६५ कपाटांतील १०१८२७ पुस्तकांसाठी जंतूनाशक औषध फवारणी करणेकामी प्राप्त दरपत्रकातील नमूद दर रू.५४,०४४/- (रूपये चोपन्न हजार चव्वेचाळीस रूपये मात्र) ह्या दरास मंजूरी देऊन त्यांचे समवेत संविदा करून मंजूर दराने जंतूनाशक औषध फवारणी (पेस्ट कंट्रोलिंग) करणेकामी प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

२०/७

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई-विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५**
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** ६२१ — **विभाग: भांडार विभाग**
**दिनांक** :२६/०७/२०२२

**विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविणेकामी राष्ट्रीय ध्वज, ध्वज उभारणीकरिता लागणारी लाकडी दांडी व झेंडा दोरी खरेदी करणेबाबत येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** केंद्र शासनाच्या सुचनेनुसार दिनांक ११ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १७ ऑगस्ट २०२२ या कालावधी मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकाव्दारे **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** अंतर्गत **"हर घर तिरंगा"** हा उपक्रम राबविणेकामी शासन परिपत्रक क्र.संकिर्ण ८२२२/प्र.क्र.११० (भाग-२)/ सां.का.४ मादाम कामा रोड , हुतात्मा राजगुरू चौक , मंत्रालय , मुंबई-४०००३२ दिनांक ३० जून २०२२ अन्वये कळविण्यात आले आहे. **"हर घर तिरंगा"** या उपक्रमा अंतर्गत सर्व शासकीय/निम शासकीय/ खाजगी आस्थापना /सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतीवर व नागरिकांनी स्वतःच्या घरावर राष्ट्रध्वजाची उभारणी स्वयंस्फुर्तीने करण्यासाठी सकारात्मक प्रभावी प्रसिध्दी मोहिम राबविणेकामी स्थानिक स्वराज्य संस्था , पोलीस यंत्रणा , शाळा व महाविद्यालये , परिवहन , आरोग्य केंद्रे , स्वस्त भाव धान्य दुकाने , सहकारी संस्था अशा सर्व सामान्य नागरिकांशी निगडीत यंत्रणाचा वापर करून सदर कार्यक्रम यशस्वी करावा अशा सुचना वरील शासन परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत.

सदर सुचनांच्या अनुषंगाने महानगरपालिका मार्फत शाळा , महाविदयालये , शासकीय , निमशासकीय, परिवहन, आरोग्य केंद्र, सरकारी संस्था प्रभाग समिती स्तरावर प्रत्येक नागरिकांना राष्ट्रीय ध्वज पुरविण्याचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक क्र : रिट याचिका - ०११२/२८७/ प्र.क्र.७८/ विशा १-अ दिनांक ०१ जानेवारी २०१५ अन्वये राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वज संहितेच्या (Flag Code Of India) कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत तरतुद आहे. यास्तव **मे.आकांक्षा शहर स्तर संघ, विरार (प.)** यांच्याकडून खालीलप्रमाणे राष्ट्रीय ध्वज, ध्वज उभारणीसाठी लागणारी लाकडी दांडी व झेंडा दोरी खरेदीचे दर देण्यात आलेले आहेत. तसेच दरपत्रकदार यांनी दरपत्रकातील एकुण रक्कमेच्या ५०% आगाऊ रक्कम मिळणेबाबत दरपत्रकात नमुद केलेले आहे.

| अ.क्र | तपशिल | दर प्रति नग (सर्व करासहित) | आवश्यक नग | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **राष्ट्रीय ध्वज (पॉलीस्टर) २४ X ३६ (इंच)** | ५६/- रूपये | ७५००० नग | ४२,००,००० |
| २ | **राष्ट्रीय ध्वज (पॉलीस्टर) ३६ X ५४ (इंच)** | २५०/- रूपये | १००० नग | २५०००० |
| ३ | **६ फुट लांब लाकडी दांडी** | ३५/- रूपये | १,५१,००० नग | ५२८५००० |
| ४ | **झेंडा दोरी (५० ग्रॅम)** | २३/- रूपये | १,५१,००० नग | ३४७३००० |
| | | | **एकुण** | **१,३२,०८,०००/-** |

त्यानुसार **मे.आकांक्षा शहर स्तर संघ, विरार (प.)** यांचे कडून राष्ट्रीय ध्वज, ध्वज उभारणीसाठी लागणारी लाकडी दांडी व झेंडा दोरी विना निविदा थेट खरेदी करणेकामी व ५०% आगाऊ रक्कम देणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब, यांना असलेल्या अधिकारानुसार व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) अन्वये **मे.आकांक्षा शहर स्तर संघ, विरार (प.)** यांचेकडून तात्काळ थेट खरेदी करून येणाऱ्या रक्कम रू. **१,३२,०८,०००/-** खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम राबविणेबाबत राष्ट्रीय ध्वज,ध्वज उभारणीसाठी लागणारी लाकडी दांडी व झेंडा दोरी खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये मा.आयुक्त साहेब, यांना असलेल्या अधिकारानुसार व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) अन्वये **मे.आकांक्षा शहर स्तर संघ, विरार (प.)** यांचेकडून राष्ट्रीय ध्वज, ध्वज उभारणीसाठी लागणारी लाकडी दांडी व झेंडा दोरी खरेदीकामी येणाऱ्या एकूण रक्कम रू. **१,३२,०८,०००/-** खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.तसेच एकूण देयक रक्कमेतील ५०% आगाऊ रक्कम अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

26/7/22
(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५

दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. ६२२ — विभाग :- वृक्षप्राधिकरण/उद्यान

दिनांक :- २६/०७/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** वृक्षलागवडी करीता स्थानिक अशासकीय संस्था एव्हरशाईन सिटी ट्री-लवर ग्रुप यांना लागवडीकरीता महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या जुन्या संरक्षण जाळया रंगरंगोटी करून पुरविणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्यालयातील वृक्षप्राधिकरण/उद्यान विभागात कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती (डी) अंतर्गत एव्हरशाईन सिटी ट्री-लवर ग्रुप या अशासकीय संस्थेमार्फत विविध प्रकारचे पर्यावरण निगडीत असणारे कार्यक्रम हाती घेण्यात येते. त्यामध्ये परिसरामध्ये जनजागृती करणे, वृक्षांची लागवड करणे, लावण्यात आलेल्या वृक्षांची वेळोवेळी निगा राखणे व त्यांना पाणी देणे तसेच त्यांचे संरक्षण करण्यात येते. सदर संस्थेच्या मागणी प्रमाणे सन २०१९ व २०२१ महानगरपालिके मार्फत आश्यकतेप्रमाणे रोपांची पुरवठा करणे तसेच आजतागयात १७० संरक्षण करण्याकरीता लोखंडी जाळया पुरविण्यात आले आहे. त्याअुनषंगाने संबंधीत संस्थेने आतापर्यत १०० जाळयाचे लावलेल्या ठिकाणांचे छायचित्र सहीत अहवाल दिलेला आहे.

सदर सन २०२२ मधील येणाऱ्या पावसाळयामध्ये नमूद एव्हरशाईन सिटी ट्री-लवर ग्रुप या संस्थेमार्फत वृक्षलागवड करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. सदर मोहीमेअंतर्गत संदर्भ क्र. ०१ मध्ये झालेल्या चर्चेनुसार संदर्भ क्र. ०२ अन्वये वृक्षलागवडीकरीता १०० लोखंडी जाळया (ट्री-गार्डस), ग्रीन नेट ५०० मीटर, शेणखत १०० किलो व लालमाती ५०० किलो याबाबतची मागणी नोंदविण्यात आलेली आहे. सदर मोहीम एव्हरशाईन परिसरामध्ये रस्तादुतर्फा येथे उपलब्ध होणाऱ्या जागे मध्ये वृक्षलागवड करण्यात येणार आहे.

सदर नमूद संस्था यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत सद्यास्थितीमध्ये वृक्ष संरक्षण लोखंडी जाळया पुरविणे शक्य आहे. सदर उपलब्ध ट्री-गार्डस सध्यापरिस्थितीत काही प्रमाणात गंजलेल्या अवस्थेत दिसून येत आहे. त्यामुळे सदर ट्री-गार्डस यांना योग्य पध्दतीने घासून रंगरंगोटी करुन घेणे आवश्यक आहे. सदर कामाकरीता बाजार भाव प्रमाणे १०० ट्री-गार्डससाठी रंग/मजूरी इत्यादी साहित्य मंजूरी करीता अंदाजित रक्कम २५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार रुपये मात्र) अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय अर्थसंकल्पीय वर्षामधील लेखाशिर्षक झांडासाठी पिंजरे खरेदीसह वृक्षनिधी वर्षामधील लेखाशिर्षक झाडांसाठी पिंजरे खरेदीसह वृक्षनिधी अंतर्गत भांडवली कामे यामध्ये तरतूद रक्कम ५,००,०००/- (अक्षरी रु. पाच लक्ष मात्र) यातून भागविता येईल.

सदर जाळया पेल्हार जलशुध्दीकरण केंद्र (पेल्हार डॅम) येथे २००० संख्येमध्ये उपलब्ध आहे. तसेच माती बाबत मे.प्रणिक एन्टप्रायईजेस यांचा ठेका मंजूर असून त्याअंतर्गत आश्यकते प्रमाणे माती उपलब्ध करुन देणे शक्य आहे. तरी एव्हरशाईन सिटी ट्री-लवर ग्रुप यांनी मागणी केल्याप्रमाणे महानगरपालिकेस उपलब्ध असलेल्या पेल्हार डॅम येथून वृक्ष संरक्षक लोखंडी जाळया (संख्या १०० नग) संस्था यांना देण्याकरीता सदरचा प्रस्ताव पुढील मंजूरीस्तव सविनय सादर.

<u>ठराव निर्णय</u> :- सदर प्रस्तावामध्ये नमूद १०० वृक्ष संरक्षक जाळ्या (Tree guards) यांना ऑईलबेस रंग रंगोटी करणे आवश्यक आहे. सदर वृक्ष संरक्षक जाळ्या यांना रंगरंगोटी करणेकामी होणारा अपेक्षित खर्च रु. रक्कम २५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार रुपये मात्र) इतका असून सदरचा खर्च सन २०२२-२३ या वर्षामधील लेखाशिर्षक झाडांसाठी पिंजरे रंगरंगोटी करणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२३/०७

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५

दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र. ६२३ | विभाग :- वृक्षप्राधिकरण/उद्यान

दिनांक :- २६/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** वृक्षलागवड केल्यावर रोपांचे जतन करण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या जुन्या संरक्षण जाळया रंगरंगोटी करुन घेणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका मागील काही वर्षापुर्वी वृक्ष प्राधिकरण/उद्यान विभागाकडून वृक्षलागवड केल्यानंतर त्याची निगा राखण्या करीता संरक्षक जाळया (ट्री-गार्ड) खरेदी करण्यात आल्या होत्या. परंतू त्यातील काही जाळया मागील दोन वर्ष कोव्हीड ची साथ असल्यामुळे संपुर्ण लॉकडाऊन मध्ये वापरण्यात आलेल्या नाहीत.

तरी सदरच्या एकूण १००० जाळयां घासून ऑईलबेस रंग लाऊन घेण्याकरीता २०२१-२२ प्रमाणे एक जाळी करीता रु.२५६/- (अक्षरी रु. दोनशे छप्पन रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी १००० जाळया करीता २,५६,४१५/- (अक्षरी रु. दोन लाख छपन्न हजार चारशे पंधरा रुपये मात्र) इतका एकूण खर्च होणार आहे. सदरचे दर बांधकाम विभागातील (S.S.R.) प्रमाणे घेण्यात आलेली आहेत.

तरी सदरचा खर्च सन २०२२ ते २०२३ या वित्तीय अर्थसंकल्प वर्षामध्ये लेखार्शिक झांडासाठी पिंजरे खरेदीसह वृक्षनिधी वर्षामधील भांडवली कामे यामध्ये तरतूद रक्कम रु. ५,००,०००/- (अक्षरी रु. पाच लाख रुपये मात्र) यातून भागविता येईल.

तरी सदरचा १००० संरक्षक जाळया (ट्री-गार्ड) रंगरंगोटी करुन घेण्याकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याकरीता मंजूरीस्तव सादर.

**ठराव निर्णय :- सदर प्रस्तावामध्ये नमूद १००० वृक्ष संरक्षक जाळया (Tree guards) यांना ऑईलबेस रंग रंगोटी करणे आवश्यक आहे. सदर वृक्ष संरक्षक जाळया यांना रंगरंगोटी करणेकामी होणारा अपेक्षित खर्च रु. रक्कम २,५६,४१५/- (अक्षरी रु. दोन लाख छपन्न हजार चारशे पंधरा रुपये मात्र) इतका असून सदरचा खर्च सन २०२२-२३ या वर्षामधील लेखाशिर्षक झाडांसाठी पिंजरे रंगरंगोटी करणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

२६/०७

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर पिन नं.४०१३०५
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र. :-** ६२४

**विभाग :- क्रीडा विभाग**
**दिनांक :-** २६/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूंना बक्षिस पर वित्त सहाय्य मंजुर करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयानुसार सादर करण्यांत येते की, मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०५ दिनांक १४/०७/२०१७ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली मंजुर केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा धोरण २०१२ यामधील आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याची योजना या शासन निर्णयामधील परिशिष्ट (अ)मधील दिलेल्या मार्गदर्शक योजनेची नियमावली व क्रीडा धोरण २०१२ मधील राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी खेळाडूंना देण्यात येणा-या शिष्यवृत्ती अन्वये पदक व रोख पारितोषिक रक्कम यामधील नियम व स्पर्धेत देण्यात येणा-या बक्षीसाचे मुल्यांकन करुन प्रस्तावीत वित्त सहाय्य मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०५ दिनांक.१४/०७/२०१७ मध्ये अंतर्भुत करुन वित्तसहाय्य व नियमावलीस मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. मा.पिठासीन अधिकारी यांच्या स्वाक्षरीची साक्षांकित प्रत जोडली आहे.

प्रस्तावात नमुद खेळाडूंनी अर्जासोबत सादर केलेल्या प्राविण्य मिळविलेल्या प्रमाणपत्रानुसार तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०५ दिनांक १४/०७/२०१७ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावली व निकष तपासून खालील खेळाडू पात्र ठरत आहेत. त्यांचा सविस्तर तपशील खालील दिलेल्या कोष्टकामध्ये दर्शविण्यांत आलेला आहे.

तक्ता क्र .१

| अ. क्र | खेळाडुचे नाव | खेळाडुचा पत्ता | स्पर्धेचे नाव | खेळाचा प्रकार | सहभाग दिनांक | परिशिष्ट | स्तर | क्रमांक | वित्त सहाय्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रितेश आत्माराम वर्तक | वरद, सागरशेत पेट्रोलपंप जवळ मांडलई, ता.वसई संपर्क-९९२३३२२०२३ | ४१ वी राष्ट्रीय इंडिया मास्टर्स अथलेटिक्स चॅम्पीयनशीप स्पर्धा २०२२ | भालाफेक | दिनांक. २० ते २२ मे, २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | प्रथम | ५०००० |
| २ | सुषमा जगदीश पाटील | ५४२ अ, अरुणप्रभा, उंबरगोठण,राउत आळी, आगाशी, ता.वसई संपर्क-९९६७८३९१३२ | ४१ वी राष्ट्रीय इंडिया मास्टर्स अथलेटिक्स चॅम्पीयनशीप स्पर्धा २०२२ | ४ x १०० | दिनांक. २० ते २२ मे, २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | प्रथम | ५०००० |
| ३ | रेहान इस्लाम शेख | इस्लाम शेख एन.व्हाय अपार्ट, बी/१०४, सिटीझन स्कुल जवळ, कोळीवाडा, वसई पश्चिम संपर्क-९८६०६७४५८५/ ७०२८४५५७२२ | ऑल महाराष्ट्र स्टेट किकबॉक्सींग सिलेक्शन चॅम्पीयनशीप २०२२-२३ | किकबॉक्सींग (म्युझिकल-एचएस) | दिनांक. १५ ते १७ मे, २०२२ | ब/३ | राज्य | प्रथम | १५००० |
| ४ | प्रिती मधुसुदन पर्वते | रुम नं. २३२, पापडी, बौद्धपाडा, वसई पश्चिम | ऑल महाराष्ट्र स्टेट किकबॉक्सींग सिलेक्शन | किकबॉक्सींग | दिनांक. २९ ते ३१ ऑक्टोंबर | ब/३ | राज्य | द्वितीय | १०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ७५१७४९२७७ | चॅम्पीयनशीप २०२१-२२ | (क्रिएटिव्ह फोरम टिम्स) | २०२१ | | | | |
| ५ | अशोककुमार परवन्ता पाल | सी/रुम नं. १०४, रुक्षभ अपार्ट, मधुबन टाउनशीप, वसई पूर्व संपर्क- ८८७९१०५६८२/ ८१८००८७४६० | पॅरा टेबल टेनिस नॅशनल चॅम्पीयनशीप २०२१ | टेबल टेनील | दिनांक. २७ ते ३० एप्रील २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | तृतीय | ३०००० |
| ६ | रिशित विपुल नथवाणी | घर क्र. ०४, एव्हरशाईन हारमोनी, एव्हरशाईन सिटी,वसई पूर्व संपर्क- ९०९६८७३९२७/ ९३७१०८४७३१ | पॅरा टेबल टेनिस नॅशनल चॅम्पीयनशीप २०२१ | टेबल टेनील | दिनांक. २७ ते ३० एप्रील २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | द्वितीय | ४०००० |
| ७ | प्रदिप राजाराम कुंभार | रुबे-सी/७०३, राजहंस ड्रीम्स, स्टेला ब-हामपुर, वसई पश्चिम. संपर्क- ९३२३५०११९३ | चौथी राष्ट्रीय मास्टर्स गेम्स २०२२ | जलतरण | दिनांक.१८ ते २२ मे,२०२२ | ब/२ | राष्ट्रीय | प्रथम | ५०००० |
| ८ | आनंद रामा वारगे | ओम वास्तू शिल्प अपार्ट, बि.नं.२, अ३१०५, डोंगर पाडा,चिखल डोंगरी रोड, विरार पश्चिम संपर्क. ९९६७८०१३६१ | २ री महाराष्ट्र स्टेट मास्टर्स गेम्स चॅम्पीयनशीप २०२१ | ४०० मी धावणे | दिनांक. २५ ते २८ नोव्हेंबर २०२१ | ब/१ | राज्य | प्रथम | २५००० |
| ९ | धनुष सुभाषचंद्र नायर | ए/१४०४ नक्षत्र बिल्डींग नं. ६ , टिवरो रोड, नायगाव पुर्व संपर्क- ९८६७७७४३७२ | ११ वी राष्ट्रीय फिल्ड इन्दौर आर्चरी चॅम्पीयनशीप २०२२ | आर्चरी | दिन.२४ ते २७ मार्च २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | प्रथम | ५०००० |
| १० | मैत्रेयी जयंत सातघरे | ४०५/सोनावाला आर्केड, सपना सिनेमा जवळ, झेंडा बाजार, वसई पश्चिम संपर्क- ७०३८१३६३५९ | १२ वी राष्ट्रीय फिल्ड इन्दौर आर्चरी चॅम्पीयनशीप २०२२ | आर्चरी | दिन.२४ ते २७ मार्च २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | प्रथम | ५०००० |
| ११ | कल्पेश दत्ता सातघरे | रुम नं. २/००२,मुळगाव, नायगाव पश्चिम संपर्क- ८०८०९९२२६/ ९८२१९९९२२६ | १२ वी राष्ट्रीय फिल्ड इन्दौर आर्चरी चॅम्पीयनशीप २०२२ | आर्चरी | दिन.२४ ते २७ मार्च २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | द्वितीय | ४०००० |
| १२ | कृपा भरत सातघरे | पंचम अपार्टमेन्ट, रुम नं. ७, बी विंग, मारुती मंदीरा जवळ, झेडा बाजार, वसई (प) संपर्क ८६६९४४१२५९ | १२ वी राष्ट्रीय फिल्ड इन्दौर आर्चरी चॅम्पीयनशीप २०२२ | आर्चरी | दिन.२४ ते २७ मार्च २०२२ | क/२ | राष्ट्रीय | प्रथम | ३०००० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | विनायक सुभाषचंद्र नायर | ए/१४०४ नक्षत्र बिल्डींग नं. ६, टिवरी रोड, नायगाव पूर्व संपर्क ९८६७७७४३७२ | १२ वी राष्ट्रीय फिल्ड इन्दौर आर्चरी चॅम्पीयनशीप २०२२ | आर्चरी | दिन.२४ ते २७ मार्च २०२२ | ब/२ | राष्ट्रीय | प्रथम | ५०००० |
| १४ | आदित्य धात्वालीया | एच न.२९९३, लागापाडा, लुईझा अपार्ट जवळ, गोखिवरे, वसई पूर्व संपर्क- ९०२२०४३२४१ | मिशन ऑलम्पीक नॅशनल चॅम्पीयनशीप २०२१ | रोलर स्केटींग | दिनांक. १५ ते १६ जानेवारी २०२२ | ब/१ | राष्ट्रीय | तृतीय | ३०००० |
| | | | | | | | | एकूण रक्कम | ५,२०,००० |

वरील प्रमाणे अर्जदारांना त्यांनी मिळविलेल्या बक्षिसानुसार व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकणा-या स्पर्धकाला प्रोत्साहन बक्षिस पर वित्त सहाय्य हे मा.सर्वसाधारण ठराव क्र.०५ दिनांक १४/०७/२०१७ नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू यांना रोख बक्षिस देऊन गौरविण्याच्या योजनेची नियमावलीच्या अनुषंगाने निकष तपासून देय वित्त सहाय्य प्रस्तावित करण्यांत आले आहे.

सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात खेळ व संघ दत्तक घेणेसह विविध स्पर्धांसाठी खेळ व संघानें प्रायोजकत्व स्विकारणे तसेच संघाना व खेळाडूंना व्यक्तीगत अर्थसहाय्य देणे या लेखाशिर्षाखाली रुपये १ कोटी इतकी तरतुद असून सदरचा खर्च नमुद लेखाशिर्षा मधुन भागविता येईल.

तरी उपरोक्त तक्त्यांमधील अर्ज क्र. १ ते १४ खेळाडुंना नियम व निकषाप्रमाणे बक्षिस पर वित्त सहाय्य मंजुर करणेकामी अंतिम निर्णयास्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या पुढे सदरचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या अंतिम मान्यतेसाठी ठेवणेंस आदेशास्तव सादर.

**प्रस्तावाचा ठराव :-** वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मागणी अर्ज क्र.०१ ते अर्ज क्र.१४ अशा एकूण १४ खेळांडूना मा.सर्वसाधारण ठराव क्र.०५ दिनांक १४/०७/२०१७ च्या सर्वसाधारण नियमावलीतील अटी व शर्ती नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त व स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना तसेच कोणतेही पदक मिळवू न शकलेल्या स्पर्धकाना प्रोत्साहन पर अनुदान देणेकामी होणाऱ्या एकूण रुपये ५,२०,०००/- इतक्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.

२५/०७

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पि नं. ४०१३०५**
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. - ६२५

विभाग:- माहिती तंत्रज्ञान
दिनांक:- २६/०७/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानरगपालिकेच्या IT Infrastructure चे सिक्युरीटी ऑडीट करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका सन २००९ मध्ये स्थापन झाली आहे. महानगरपालिकेत अंतर्गत मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती कार्यालये, ३ रुग्णालय, २१ नागरी आरोग्य केंद्र व ७ अग्निशमन केंद्र कार्यालये कार्यरत आहेत. या सर्व कार्यालयांमध्ये विविध प्रकारची कामे संगणकीय पद्धतीने पार पाडली जातात. सदर कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात माहितीची देवाण-घेवाण होत असते. सदर माहितीची गोपनियता अंत्यत महत्वाची असते. महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये एकुण ४६६ संगणक कार्यरत आहेत. ह्या सर्व कार्यालयातील IT Infrastructure च्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सिक्युरीटी ऑडीट करणे गरजेचे आहे. सदर सिक्युरीटी ऑडीट मध्ये खालील बाबंचा समावेश असेल.

१. Internal Computers
२. Net working components
३. File storage system
४. Network layers L२ to L७ testing
५. Intrusive, non intrusive testing
६. DOS attatck possibility testing

सदर सिक्युरीटी ऑडीट केल्याने खालीलप्रमाणे फायदे होऊ शकतात.

१. ऑडीटमुळे संभाव्य धोके ओळखता येत असल्याने सावधगिरीच्या उपाय योजना करता येतील.
२. महानगरपालिकेची संवेदनशील माहिती सुरक्षित ठेवण्यास मदत होईल.
३. नागरीकांना विना व्यत्यय ऑनलाईन सुविधांचा लाभ घेता येईल.

सदर IT Infrastructure चे सिक्युरीटी ऑडीट करणेसाठी अंदाजित रक्कम रु. ६,९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र. ९७३-४१७२, मा.तं.वि. संगणक प्रणाली माहिती तंत्रज्ञान अनुषंगीक खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी वरील सर्व सॉफ्टवेअरचे सिक्युरीटी ऑडीट करणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव/निर्णय:-** वसई विरार शहर महानरगपालिकेच्या IT Infrastructure चे सिक्युरीटी ऑडीट करणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणाऱ्या रक्कम रु. ६,९०,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पि नं. ४०१३०५**
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. - ६२६

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:-२६/०७/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कार्यरत संगणकांकरीता ॲन्टीवायरस (एका वर्षाकरीता) खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिकेत मुख्यालयासह, ९ प्रभाग समिती कार्यालये, ३ रुग्णालये, २१ नागरी आरोग्य केंद्र व ७ अग्निशमन केंद्र कार्यालये कार्यरत आहेत. या सर्व कार्यालयांमध्ये विविध प्रकारची दैनंदिन कामे संगणकीय पद्धतीने पार पाडली जात असल्याने सर्व विभागाअंतर्गत संगणक पुरविण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये एकुण ४६६ संगणक कार्यरत आहेत. तरी सदर संगणकां अंतर्गत असलेला डेटा हा अंत्यत महत्तवाचा आहे. तसेच महापालिकेत विविध विभागाअंतर्गत इंटरनेट द्वारे होणा-या कामकाजाकरीता सर्व संगणकांना इंटरनेट जोडणी करण्यातआलेली आहे. सदर इंटरनेट मार्फत संगणकांमध्ये अनेक प्रकारचे वायरस येतात. त्यामुळे सदर संगणकामध्ये असलेला डेटा नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर डेटा नष्ट झाल्यास विभागातील दैनंदिन कामकाजामध्ये अडथळे निमार्ण होऊ शकतात. तरी सदर वायरस मुळे संगणकांमधील डेटा नष्ट होऊ नये याकरीता सर्व संगणकामध्ये ॲन्टीवायरस कार्यान्वित (Install) करणे गरजेचे आहे. सदर ॲन्टीवायरसचे वैशिष्टये खालीलप्रमाणे.

१. Data Breach Alert
२. Ransomware Protection
३. Safe Banking
४. Anti Tracker
५. Webcam Protection
६. File Vault
७. Anti-Key Logger
८. Data Theft Protection
९. Parental Control

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेतील कार्यालयांमधील सर्व संगणकांमध्ये एका वर्षाकरीता ॲन्टीवायरस कार्यान्वित (Install) करणे कामी प्रती ॲन्टीवायरसचा एका वर्षाकरीता अंदजित खर्च रक्कम रु १९०९/- इतका असून त्यानुसार ४६६ संगणकांमध्ये ॲन्टीवायरस कार्यान्वित (Install) करणे कामी अंदाजीत रक्कम रु.८८९५९४/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च लेखासांकतांक क्र. ०४१-४१७२-१ संगणकीय साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत भागविता येईल. तरी दरपत्रकाद्वारे एजन्सी निश्चित करुन एका वर्षाकरीता ॲन्टीवायरस खरेदी करणेकामी व होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेस्तव सादर.

**<u>ठराव/निर्णय:-</u>** वसई विरार शहर महानगरपालिकेतील कार्यरत संगणकांकरीता ॲन्टीवायरस (एका वर्षाकरीता) खरेदी करणेकामी दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करणेस व होणाऱ्या रक्कम रु.८८९५९४/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(अनिलकुमार पवार)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

५(६१)

# वसई विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पि नं. ४०१३०५**
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. - ६२७

विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- २६/०७/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेतील संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर व इतर संगणकीय साहीत्यांची ३ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-निविदा द्वारे एजन्सी निश्चित करणेकामीच्या निविदेतील लघुत्तम निविदाकाराचे दर मंजूर करुन करारनामा करणेस व कार्यादेश देणेस मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानरगपालिकेतील संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर व इतर संगणकीय साहीत्यांची ३ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेकामी ई-निविदा द्वारे एजन्सी निश्चित करुन खरेदी करणेकामी मा. प्रशासकीय ठराव क्र. ८५ दि. २५/०४/२०२२ रोजीच्या मंजूरी अन्वये जा.क्र. वविशम/मा.तं./२३/२२-२३ दि. ०५/०५/२०२२ रोजी अन्वये निविदा प्रसिद्ध करुन दि. ०६/०५/२०२२ ते दि. १९/०५/२०२२ या कालावधीत ई-निविदा सादर करण्यात आली होती. सदर कालावधीत निविदेसाठी एकुण ४ निविदाकांरानी सहभाग घेतला होता. निविदेतील सहभाग घेतलेल्या ४ निविदाकरांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली होती परंतू एका निविदाकारानेवित्तीय बाबींचे दर तांत्रिक दस्ताऐवज (envelop १) मध्ये भरले असल्याने मा. निविदा समितीच्या दि. १०/०६/२०२२ रोजीच्या मंजूरी अन्वये सदर निविदाकारास अपात्र करुन उर्वरित ३ पात्र निविदाधारकांचे क्र. २ चे वित्तीय बाबींचे लिफाफे दि. १३/०६/२०२२ रोजी उघडण्यात आले. त्याअनुषंगाने निविदेतील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | नग | Essjay Copier Pvt. Ltd | Yash Enterprises | Saavi Infiner Pvt. Ltd |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकुण रक्कम रु. (सर्व करांसहीत) | एकुण रक्कम रु. (सर्व करांसहीत) | एकुण रक्कम रु. (सर्व करांसहीत) |
| १ | Computer | १ | ७६९.३६ | २४७८.०० | १२९९.९९ |
| २ | Laserjet Printer | १ | ७६९.३६ | २३६०.०० | ४००.०० |
| ३ | Color Printer | १ | ७६९.३६ | २१२४.०० | ३५०.०० |
| ४ | Scanner | १ | ७६९.३६ | २१२४.०० | १५००.०० |
| ५ | Motherboard G४१ | १ | २३६०.०० | ३३०४.०० | १५००.०० |
| ६ | Motherboard H६१ | १ | ३७७६.०० | ९१४५.०० | २४००.०० |
| ७ | Motherboard H८१ | १ | ४३६६.०० | ८३१९.०० | २८००.०० |
| ८ | Motherboard H११० | १ | ७४३४.०० | ९४९९.०० | ३०००.०० |
| ९ | Motherboard SFF (socket LGA ११५१) | १ | ८४९६.०० | ८८५०.०० | ४६००.०१ |
| १० | CPU fan (compatible with above motherboard) | १ | ५९०.०० | २००.६० | १५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | RAM DDR२ २gb (compatible with above motherboard) | १ | २१२४.०० | ४८३.८० | ३०९.०० |
| १२ | RAM DDR३ २gb (compatible with above motherboard) | १ | २३६०.०० | ५७२.३० | ४५०.०० |
| १३ | RAM DDR४ ४gb (compatible with above motherboard) | १ | ३७७६.०० | ११२१.०० | ९४९.९९ |
| १४ | RAM DDR४ ४gb (compatible with above motherboard) | १ | ४४८४.०० | १८२९.०० | १४५०.०० |
| १५ | SMPS ATX | १ | १२९८.०० | १००३.०० | ५५०.०० |
| १६ | SMPS SFF | १ | ३१८६.०० | २२४२.०० | ३५०.०० |
| १७ | Cabinet ATX | १ | ३०६८.०० | ५७८२.०० | १०००.०० |
| १८ | CMOS battery | १ | ५९.०० | २९.५० | ५.०० |
| १९ | Logic board | १ | ३३०४.०० | २८३२.०० | २८००.०० |
| २० | Power board | १ | २१२४.०० | २३०१.०० | १८५०.०० |
| २१ | Laser Scanner | १ | ९४४.०० | २१२४.०० | ८६०.०० |
| २२ | Teflon | १ | ५६०.५० | १२९८.०० | ५५०.०० |
| २३ | Pressure roller | १ | ६७८.५० | ३५४.०० | ५५०.०० |
| २४ | Fedd roller | १ | ८८.५० | २९५.०० | ५५०.०० |
| २५ | Fuser Unit | १ | १४१६.०० | २३६.०० | ५५०.०० |
| २६ | Logic Board | १ | ३१८६.०० | ३०६८.०० | १८००.०० |
| २७ | Waste Inkpad | १ | ३२४.५० | २१२.४० | १२००.०० |
| २८ | Print Head | १ | ३५४०.०० | ८२६.०० | ३००.०० |
| २९ | Power Board | १ | १८८८.०० | १७७.०० | १०००.०० |
| ३० | ६००VA UPS Battery (१२v) | १ | २३६०.०० | ११५६.४० | ५५०.०० |
| ३१ | ६००VA UPS Circuit | १ | २९५०.०० | ९४४.०० | १०००.०० |
| ३२ | LED Monitor १९.५ inch | १ | १०४९९.६४ | ६९६२.०० | ३९९९.९९ |
| ३३ | Internal HDD ५०० GB | १ | ४६०२.०० | ४३५४.२० | ३५००.०० |
| ३४ | Internal SSD २५६ GB | १ | ५३१०.०० | २५३७.०० | १८००.०० |
| | | **एकुण** | ९४२३०.०८ | ९११४३.२० | **४५११४.९८** |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे दरांची तुलना केली असता मे. Saavi Infiner Pvt. Ltd यांचे निविदेतील अटीशर्ती नुसार एकुण रक्कम तुलनात्मकरित्या कमी असल्याने सदर निविदाकार L१ ठरत आहे. परंतू काही घटकांकरीतांचे दर इतर निविदाकारांच्या दरांच्या तुलनेत जास्तच कमी असल्याने इतक्या कमी दरात ठेकेदार काम करु शकतो का? व उत्तम दर्जाची सेवा वेळेत देऊ शकतो का? याबाबतचा खुलासा करणेकामी, तसेच घटक क्र. १,४,२३,२४,२५,२७,२९,३१ या घटकांकरीता दर जास्त असल्याने सदर दरात वाटाघाटी करणेकामी निविदा समितीच्या निर्देशाप्रमाणे मे. Saavi Infiner Pvt. Ltd यांना जा.क्र. वविशम/मा.तं/५७/२२-२३ दि. १६/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार मे. Saavi Infiner Pvt. Ltd यांनी दि. २२/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये निविदेत सादर केलेले दर इतर निविदाकारांच्या दरांच्या तुलनेत कमी असले तरी सदर दरात ते चांगल्या दर्जाचे व सदर सेवा सुरळीतपणे व वेळेत देतील. तसेच घटक क्र. १ वगळता इतर घटक क्र. ४,२३,२४,२५,२७,२९,३१ या बाबींकरीता वाटाघाटी केली असून सदर दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | नग | Essjay Copier Pvt. Ltd | Yash Enterprises | Saavi Infiner Pvt. Ltd | Saavi Infiner Pvt. Ltd |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकुण रक्कम रु. (सर्व करांसहीत) | एकुण रक्कम रु. (सर्व करांसहीत) | एकुण रक्कम रु. (सर्व करांसहीत) | वाटाघाटी अंती दर रक्कम रु. (सर्व करांसहीत) |
| १ | Computer | १ | ७६९.३६ | २४७८.०० | १२९९.९९ | १२९९.९९ |
| २ | Laserjet Printer | १ | ७६९.३६ | २३६०.०० | ४००.०० | ४००.०० |
| ३ | Color Printer | १ | ७६९.३६ | २१२४.०० | ३५०.०० | ३५०.०० |
| ४ | Scanner | १ | ७६९.३६ | २१२४.०० | १५००.०० | ७६९.३६ |
| ५ | Motherboard G४१ | १ | २३६०.०० | ३३०४.०० | १५००.०० | १५००.०० |
| ६ | Motherboard H६१ | १ | ३७७६.०० | ११४५.०० | २४००.०० | २४००.०० |
| ७ | Motherboard H८१ | १ | ४३६६.०० | ८३१९.०० | २८००.०० | २८००.०० |
| ८ | Motherboard H११० | १ | ७४३४.०० | ९४९९.०० | ३०००.०० | ३०००.०० |
| ९ | Motherboard SFF (socket LGA ११५१) | १ | ८४९६.०० | ८८५०.०० | ४६००.०१ | ४६००.०१ |
| १० | CPU fan (compatible with above motherboard) | १ | ५९०.०० | २००.६० | १५०.०० | १५०.०० |
